शुभविवाह
सोहळ्या करिता
ऑर्केस्ट्रा स्वर साधना
प्रा. जनार्धन बोडखे (संगीत विशारद)
संपर्क : 9421479180

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड
रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १७.११.२०२६ | अंक नं. १९२ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे
जिंकण्याची संधी...
विश्वसनीय कापडांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर 02425-222220 | अ.नगर 0241-2999299 | नारायणगाव 02132-242132 | श्रीरामपूर 02422-220090 | नाशिक 9920552700

वारंवार अतिक्रमण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

सराफ बाजार असोसिएशन व्यापारी व स्थानिक रहिवासी नागरिकांचे महापालिका प्रशासनाला साकडे

नगर – नगर शहरातील मुख्य बाजारपेठमधील गंज बाजार परिसरात अतिक्रमणधारक दुकानदार, फळ विक्रेते वारंवार अतिक्रमण करत आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोऱ्या टांगण्यात आलेल्या असून त्यावर साहित्य लटकवण्यात आले आहे. काही दुकानदार जाणून-बुजून अतिक्रमण करून पूजेचे साहित्य व इतर साहित्य सार्वजनिक जागेवर टांगतात. या बाबींचा उद्देश सार्वजनिक जागेवर कब्जा मिळवणे असाच होतो. महापालिकेने यांच्यावर प्रतिदिन पाच हजार रुपये अशी दंडात्मक कारवाई करावी व गुन्हे दाखल करावेत अशी मागणी सराफ बाजार असोसिएशन व्यापारी व स्थानिक रहिवासी नागरिक यांनी केली आहे. याबाबत सराफ बाजार असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश लोळगे व व्यापाऱ्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, काहींनी दुकानाच्या पाच फुट पुढे लोखंडी साच्यावर साहित्य मांडले आहे. महापालिकेने या बाबींकडे लक्ष देण्याची गरज आहे. चौकामध्ये रस्त्यावर दुचाकी वाहने पण मोठ्या प्रमाणावर लागतात. रस्त्याच्या वळणावर आडव्या तिडव्या गाड्या लावण्यात येतात. त्यामुळे हातगाडी ओढणाऱ्या हमालांना माल नेताना त्रास निर्माण होतो. गंज बाजार चौकातील काही दुकानदार म्हणतात आमच्याकडे अनेकजण कामाला आहे त्यामुळे आम्ही अतिक्रमण करणार व कारवाई झाली की परत त्याच जागेवर दुकाने लावणार. जे कोणी अतिक्रमणधारक व्यापारी अशा प्रकारे विनाकारण नागरिकांना त्रास देण्याचे काम करत असतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे.

एकदा जप्त केलेले साहित्य त्यांना परत मनपाने देऊ नये. शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशीही अतिक्रमण विभागाने कारवाई करावी. या अतिक्रमण करणाऱ्यांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. तसेच ह्यांच्यामुळे सराफ बाजारही दिसत नाही. हे अतिक्रमणधारक महिलांना अरेरावीची भाषा करतात. महिलांना दुचाकी वाहने लावून देत नाही. यांनी सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. या बाबीकडे शहर वाहतूक शाखेसह कोतवाली पोलीस स्टेशननेही लक्ष देणे गरजेचे आहे असे प्रश्न जर प्रशासन सोडवत नसेल तर प्रशासनाचा नागरिकांना काय उपयोग असा सवाल व्यापाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे महापालिकेने या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन सातत्याने कारवाई करत गुन्हे दाखल करावे दंडात्मक कारवाई करावी आणि हे प्रश्न कायमचे मार्गी लावावे अशी मागणी सराफ बाजार असोसिएशन, स्थानिक व्यापारी, नागरिक व रहिवासी यांनी या निवेदनाच्या माध्यमातून केली असून या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री, आमदार, महापौर, उपमहापौर, विविध विषयांचे सभापती, जिल्हाधिकारी आदींना देण्यात आल्या आहेत.

नवीन वर्षाला कुठे आहात तुम्ही ?
सिंगा-मले-थाय-दुबई-अबुधाबी-केरळ-अंदामान
शिमला-मनाली की वाराणसी, अयोध्या येथे
चलो बॅग भरो निकल पडो.. काही सहली पुणे ते पुणे उपलब्ध...
सिंगापुर मलेशिया थायलंड 1,92,000/- १० दिवस
वाराणसी अलाहबाद 58,000/- ८ दिवस
बेस्ट ऑफ अंदमान 74,000/- ७ दिवस
हनिमून शिमला मनाली 52,000/- ७ दिवस
नैनिताल मसुरी कॉर्बेट 64,000/- ९ दिवस
दुबई अबुधाबी 88,919/- ५ दिवस
राजस्थान मेवाड 53,000/- ८ दिवस
सिक्कीम दार्जिलिंग 80,000/- ९ दिवस
केरळ 35,000/- ६ दिवस
बेस्ट ऑफ कश्मिर 56,000/- ६ दिवस
फुकेत क्राबी 96,000/- ४ दिवस
हायलाईटस् ऑफ भुतान 82,000/- ७ दिवस
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432, 9112384842
नाटाळकी रोड, कलिका प्राईड, २ रा मजला, ऑफिस नं. २०६, अहमदनगर.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची) + ₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
11 सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

पोलीस ठाण्याच्या आवारातच राडा; शिवीगाळ व झटापट, गुन्हा दाखल

नगर – पोलीस ठाण्याच्या आवारातच चार जणांनी आपसात आरडाओरडा करत शिवीगाळ व झटापट केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात संबंधित चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नामदेव माधव हराळे (वय ५५), केतन नामदेव हराळे, निखील नामदेव हराळे (सर्व रा. पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) आणि राहुल सुनिल शिंदे (रा. बुरुडगाव/बुऱ्हाणनगर रोड, नागरदेवळे फाटा, अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १६ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार वैभव मच्छिंद्र झिने हे अन्य सहकाऱ्यांसह ठाणे अंमलदार कक्षात दैनंदिन कामकाज करत होते. त्याच वेळी कक्षाबाहेर पोलीस ठाण्याच्या आवारात मोठा आरडाओरडा ऐकू आला. अंमलदार झिने आणि हवालदार गव्हाणे यांनी बाहेर जाऊन पाहिले असता, वरील चार इसम आपसात शिवीगाळ करत एकमेकांशी झुंज करताना दिसून आले. पोलिसांनी तत्काळ मध्यस्थी करत त्यांची सोडवणूक केली आणि नावे व पत्ते विचारून ताब्यात घेतले.

सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच थेट पोलीस ठाण्याच्या आवारात शांतता भंग केल्याप्रकरणी पोलीस अंमलदार वैभव झिने यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून चौघांविरोधात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १९४(२) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बापूसाहेब मस्के या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे.
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर

रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात छाती (फुप्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine) Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 19 नोव्हेंबर 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुप्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार
• ॲलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी अहिल्यानगर भेट
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915

केडगावमध्ये एकाची गळफास घेत आत्महत्या

नगर – केडगाव उपनगरात नेप्ती रोडवरील विश्वलक्ष्मी हॉटेल समोर असलेल्या गजानन कॉलनीमध्ये एकाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. सागर गोरक्ष खंडागळे (वय ४३) असे मयत इसमाचे नाव आहे.

सागर खंडागळे यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्याच्या नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णवाहिकेद्वारे नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच सकाळी १०.३० च्या सुमारास मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मयत सागर यांच्या पश्चात आई, भाऊ, भावजयी असा परिवार आहे.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे | महिलांसाठी पादत्राणे | मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर
मो : 9881531536

PURE EV
अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी डीलरशिप देणे आहे
GO.. PURE GO.. GREEN
तुमची आवडती ई ही बाईक खरेदी करा आणि मिळवा आकर्षक बक्षीस
नूतन वर्ष NEW OFFER
नवीन वर्षाच्या ऑफर्स सुरू!
4000/- रुपयांपर्यंत कॅशबॅक
आणि सोबत मोफत ॲक्सेसरीज!
(सेफ्टी गार्ड, फूट रेस्ट, हेल्मेट, मॅट आणि नंबर प्लेट ब्रॅकेट)
ही ऑफर मर्यादित काळासाठीच आहे.
इलेक्ट्रिक वाहनांचे नवे युग यासाठी आजचं भेट द्या
श्री. सिमरन सुभाष विखोना 9767119099 / 7387419999
सौ. प्रिती सिमरन विखोना 8668854061 / 7389389393
पत्ता - साई श्याम पि.वि. गांधी विकास फर्निचर शेजारी नेवासा- नेवासा फाटा रोड

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

मध्यरात्रीच्या वेळी घर फोडून सोन्याच्या दागिन्यांसह लाखो रुपयांच्या ऐवज लंपास

नगर – मध्यरात्रीच्या सुमारास तीन अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्याच्या बंद घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला आणि तब्बल ५ लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना श्रीगोंदा तालुक्यातील चांभुर्डी गावच्या शिवारातील ढगेवाडी येथे १६ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत सागर अशोक चव्हाण (वय ३०, रा. ढगेवाडी, चांभुर्डी, ता.श्रीगोंदा) यांनी फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ढगेवाडी येथील शेतकरी सागर चव्हाण यांचे घर १६ नोव्हेंबर रोजी रात्री बंद होते. याच दरम्यान पहाटे २ च्या सुमारास तीन अज्ञात चोरट्यांनी घराच्या पाठीमागच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील तब्बल ५ लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले.

सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर सागर चव्हाण यांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात तीन चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३३१(७) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या घटनेची माहिती मिळताच बेलवंडी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. नंदकुमार सोनवलकर आणि उपनिरीक्षक विजयकुमार कोठावळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे करत आहेत.

महापालिकेच्या न्यायालयीन विभागाचे काम म्हणजे आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय

सभापती सुभाष लोंढेंनी स्थायी समितीच्या सभेत व्यक्त केला संताप, पाण्याची नासाडी करणाऱ्यांना चार हजारांचा दंड

नगर– शहराच्या विकासकामांमध्ये होत असलेली दिरंगाई, अधिकाऱ्यांची अनुपस्थिती, न्यायालयीन प्रकरणांमधील महापालिकेची ढिसाळ भूमिका, पाणीपुरवठ्यातील अनियमितता आणि वाढत्या चोऱ्यांसह विविध प्रश्नांवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा उभारणीच्या कामाला तसेच महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्याला उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याच्या मुद्द्यावरून सभेत जोरदार चर्चा झाली.

महापालिकेचा न्यायालयीन विभाग नेमके काय काम करतो? वकिलांवर लाखो रुपये खर्च करूनही न्यायालयात महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडली जात नसेल तर त्याचा उपयोग काय? असा सवाल नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थित केला. यावर सभापती पै. सुभाष लोंढे यांनी नाराजी व्यक्त करत न्यायालयीन विभागाच्या कामकाजाचा सविस्तर अहवाल पुढील सभेत सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच पाण्याची नासाडी करणाऱ्यांना चार हजार रुपयांचा दंड आणि त्यानंतरही सुधारणा न झाल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

महापालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती पै. सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपायुक्त मेहर लहारे, सदस्य तथा माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक निखिल वारे, मनोज कोतकर, मनोज दुल्लम, नवनाथ कातोरे, नगरसेविका संध्याताई पवार यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीलाच नगरसेवक निखिल वारे यांनी महापालिकेच्या न्यायालयीन विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसेच महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यालाही उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या दोन्ही महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी न्यायालयीन विभागाने काय प्रयत्न केले, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी न्यायालयीन विभागाचे अधिकारी आणि महापालिकेच्या पॅनलवरील वकील सभेला उपस्थित राहत नाहीत, याबाबतही नाराजी व्यक्त केली.


महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत नागरी समस्यांवर प्रशासनाला धारेवर धरताना नगरसेवक. (छायाचित्र : लहू दळवी)

यावर सभापती पै. सुभाष लोंढे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत महापालिकेत प्रभारी राज सुरू असल्याचे सांगितले. कोणता अधिकारी नेमके काय काम करतो, याची माहितीही प्रशासनाला नसल्याचे चित्र आहे. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. न्यायालयीन विभागाचे कामकाज म्हणजे ङ्घआंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंयफ अशी परिस्थिती झाली असल्याची खंत व्यक्त करत पुढील सभेत सर्व प्रकरणांचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले.

दुसऱ्यांदा प्रकार घडल्यास गुन्हा दाखल करणार

शहरात मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असल्याचा मुद्दा सभेत उपस्थित करण्यात आला. धरणात मुबलक पाणी उपलब्ध असले तरी शहरात पाणी साठवण्याची क्षमता मर्यादित आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. फेज टू पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असेल तर शहरातील पाण्याची नासाडी थांबली पाहिजे, असे सभापती लोंढे यांनी स्पष्ट केले. पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर चार हजार रुपयांचा दंड आकारण्यात यावा. दंडात्मक कारवाईनंतरही संबंधित व्यक्तीने पुन्हा पाण्याची नासाडी केल्यास त्याच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

महापालिकेच्या चारही प्रभाग समिती कार्यालयांनी आतापर्यंत पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर किती कारवाया केल्या, असा प्रश्न माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी उपस्थित केला. विशेषतः मुकुंदनगर परिसरात अत्यंत कमी कारवाई झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन शहरातील परिस्थितीची माहिती संकलित करावी आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन नियोजनाचा अहवाल तयार करावा, असे निर्देश सभापती लोंढे यांनी दिले.

शहरात भरदिवसा चोऱ्यांचे प्रमाण

शहरात भरदिवसा चोऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याचा मुद्दा नगरसेवक मनोज कोतकर यांनी उपस्थित केला. नगरसेविका संध्याताई पवार यांच्या घरीही भरदिवसा चोरी झाल्याची घटना घडली आहे. शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून प्रमुख चौकांसह विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. यामुळे पोलिसांना चोरट्यांचा शोध घेण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. यावर सभापती लोंढे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

ऐतिहासिक वास्तूचे सर्वत्र विद्रूपीकरण

माळीवाडा वेशीजवळ मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण होत असल्याचा मुद्दा नगरसेवक निखिल वारे यांनी उपस्थित केला. माळीवाडा वेस नेमकी कोणाच्या मालकीची आहे, महापालिकेच्या मालकीची असल्यास तिची स्वच्छता आणि देखभाल करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. मात्र, ऐतिहासिक वास्तूचे सर्वत्र विद्रूपीकरण होत असल्याने प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. यावर संबंधित विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. शहराचे विद्रूपीकरण करणाऱ्यांविरोधात यापुढे फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.



महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये कार्यालयीन वेळेच्या शिस्तीचा अभाव असल्याने महापौर ज्योती गाडे यांनी उशिरा कामावर आलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरी मस्टर बुक ताब्यात घेऊन तपासणी केली. (छायाचित्र : लहू दळवी)

लेटलतीफ कर्मचाऱ्यांना महापौरांनी दिला दणका

महापालिकेत उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकावर लेटमार्क नोंदविण्याचे प्रशासनाला निर्देश

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये कार्यालयीन वेळेच्या शिस्तीचा अभाव असल्याचे १७ नोव्हेंबर रोजी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या निदर्शनास आले. सकाळी ९.३० वाजता महापौर गाडे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात दाखल झाल्या असता, बहुतांश कर्मचारी निर्धारित वेळेत कामावर हजर नसल्याचे आढळून आले. या प्रकाराची तातडीने दखल घेत महापौरांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी मस्टरची तपासणी करून लेटमार्क नोंदविण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

महापौर गाडे यांनी उशिरा कामावर आलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरी मस्टर बुक ताब्यात घेऊन तपासणी केली. त्यावर उशिराचा शेरा मारत संबंधित कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकावर लेटमार्क नोंदविण्याबाबत कार्यवाही सुरू केली. तसेच महापालिकेतील संबंधित विभागांच्या कार्यालयांची पाहणी करून त्यांनी नाराजी व्यक्त केली.

नागरिक आपल्या विविध कामांसाठी सकाळी दहा वाजल्यापासून महापालिकेत येत असतात. मात्र, कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांचे प्रश्न वेळेत मार्गी लागत नाहीत. यावेळी पुण्याहून दाखला मिळविण्यासाठी एक महिला सकाळी पावणेदहा वाजता महापालिकेत आल्या होत्या. मात्र, ज्या विभागात त्यांचे काम होते, त्या विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे संबंधित महिलेने नाराजी व्यक्त केली.

गेटवरच घेतली कर्मचाऱ्यांची हजेरी

हा प्रकार पाहून महापौरांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारावरच खुर्ची टाकून महापौर गाडे यांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची तपासणी केली आणि कार्यालयीन शिस्तीबाबत नाराजी व्यक्त केली. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करणे अपेक्षित असताना बहुतांश कर्मचारी वेळेत उपस्थित नसल्याचे चित्र समोर आल्याने महापौरांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यापुढे कर्मचाऱ्यांच्या वेळेतील अनियमिततेकडे दुर्लक्ष न करता उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकावर नियमानुसार लेटमार्क नोंदविण्याचे निर्देश त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले. महापौरांच्या या अचानक पाहणीमुळे महापालिका कर्मचाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. दरम्यान, लेटमार्कची नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांवर महापालिका प्रशासनाकडून पुढे नेमकी काय कारवाई केली जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

हॉटेलबाहेर कारची काच फोडून महिला वकिलाच्या पर्सची चोरी

छत्रपती संभाजीनगर रोडवरील घटना, रोकडसह महत्वाची कागदपत्रेही लांबविली

नगर – नगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर धनगरवाडी (ता.नगर) शिवारात असलेल्या हॉटेल ऑरेन्ज व्हॅली समोरील रस्त्यावर उभ्या केलेल्या महिला वकिलाच्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्यांनी कारमधील रोकड असलेली पर्स आणि महत्त्वाची कागदपत्रे लांबवल्याची घटना भरदिवसा घडली आहे.

याप्रकरणी वकील तेजस्वी विलास तवले (वय ३४, रा. प्रिमियम आयकॉन, जिजाऊ नगर, कल्याण रोड, अहिल्यानगर) यांनी १६ नोव्हेंबर रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी वकील तेजस्वी तवले यांनी त्यांची चारचाकी गाडी (क्र. एमएच १६ डी एल ००२८) ही हॉटेल ऑरेन्ज व्हॅली समोरील रस्त्यावर लावली होती आणि त्या जेवणाचे पार्सल आणण्यासाठी गेल्या होत्या. त्याच दरम्यान अज्ञात चोरट्यांनी संधी साधून गाडीच्या मागील बाजूची डावीकडील काच फोडून गाडीत ठेवलेली पर्स चोरून नेली. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ४ हजार ५०० रुपये रोख रक्कम, ज्यामध्ये पाचशे रुपयांच्या आठ नोटा आणि शंभर रुपयांच्या पाच नोटांचा समावेश होता. तसेच सॅनडिस्क कंपनीचा पेनड्राइव्ह, ओळखपत्र, पॅन कार्ड, गाडीचे आरसी बुक, ड्रायव्हिंग लायसन्स, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे ओळखपत्र आणि इतर किरकोळ सामान असा ऐवज चोरट्यांनी लांबवला. फिर्यादीने तक्रार दिल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात आणि पो. हे. कॉ. बापूसाहेब फोलाणे यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला आहे. या प्रकरणी बीएनएस कलम ३०३ (२), ३२४(४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो. हे. कॉ. बापूसाहेब फोलाणे करत आहेत.

बिबट्याच्या शोधासाठी वनविभागाच्या पथकाची रात्रंदिवस गस्त

सीक्युएव्ही परिसरात लावला पिंजरा, इतरत्र ड्रोनच्या सहाय्याने शोध मोहीम

नगर – सावेडी उपनगरातील दाट लोकवस्ती असलेल्या तारकपूर, प्रकाशपूर, सिव्हिल हडको परिसर, गंगा उद्यान परिसर, कलेक्टर ऑफिस रोड परिसरात तसेच महापालिका कार्यालयाशेजारील सीक्युएव्ही परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने वन विभाग सतर्क झाला असून वनविभागाचे पथक या परिसरात रात्रंदिवस गस्त घालत तसेच ड्रोनच्या सहाय्याने बिबट्याचा शोध घेत आहे. सीक्युएव्ही परिसरात ड्रोन कॅमेऱ्यात बिबट्याची हालचाल दिसून आल्याने त्या ठिकाणी वन विभागाने पिंजरा लावला असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी दिली.

शहराच्या मध्यवर्ती भागात सावेडी उपनगरात बिबट्याचा वावर आढळून आल्याचा दावा केला जात होता. ड्रोन कॅमेऱ्यात ही हालचाल दिसून आल्यानंतर, १५ नोव्हेंबर रोजी हा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला. त्यामुळे परिसरात दहशत पसरली आहे. विशेषतः सीक्युएव्ही परिसरात बिबट्याची हालचाल ड्रोन कॅमेऱ्यात हालचाल दिसून आल्यानंतर, वनविभागाने सीक्युएव्ही परिसरात पिंजरे लावल्याची माहिती दिली.

शहरातील सीक्युएव्ही परिसरात मनपा, जिल्हाधिकारी कार्यालय, गंगा उद्यान व दाट लोकवस्तीचा भाग आहे. व्हिडिओ समोर आल्यानंतर वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे. दरम्यान, वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी सीक्युएव्ही परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे आम्हाला कळवले होते. त्यानुसार त्या ठिकाणी पिंजरे लावले आहेत, असे सांगितले. दरम्यान, पोलिसांनी शहरात बिबट्याचा वावर असून नागरिकांनी सतर्क राहण्याचा सूचना दिल्या. रात्री घटनास्थळीही पोलिस दाखल झाले होते. १५ नोव्हेंबर रोजी बिबट्या डिटेक्ट झाला आहे. हा दाट लोकवस्तीचा भाग असून शासकीय कार्यालये व गंगा उद्यान आहे. बिबट्या लोकवस्तीत शिरण्याची भिती आहे. काही घडले तर वनविभाग व जिल्हा प्रशासन जबाबदार राहील. त्यामुळे तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांनी केली आहे.

२ बिबटे असण्याची शक्यता

हॉटेल इंद्रायणीच्या पाठीमागील शेतात १५ नोव्हेंबर रोजी रात्री पावणेनऊ वाजता बिबट्या दिसल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. सीक्युएव्ही परिसरात परिसरात ड्रोन कॅमेऱ्यात कैद झालेला बिबट्या आणि हॉटेल इंद्रायणी परिसरात दिसलेला बिबट्या हे दोन्ही बिबटे वेगवेगळे असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

नागरिकांनी खबरदारी घ्यावी

बिबट्या आपल्या भागात आहे, असे निदर्शनास आल्यास नागरिकांनी घाबरून न जाता खबरदारी घेणे आवश्यक आहे. रात्री अंधारात एकटे बाहेर पडू नये तसेच लहान मुलांना बाहेर एकटे खेळू देऊ नये. बिबट्या जवळपास आढळून आल्यास फटाके वाजवल्यास तो दूर पळून जातो. शेतात रात्री जाण्याची वेळ आली तर हातात मोठी काठी ठेवावी तसेच सोबत किमान दोन व्यक्ती तरी असाव्यात. आपली पाळीव जनावरे शक्यतो बंदिस्त ठेवावीत. घराच्या बाहेर अंधार नसावा. बाहेरील लाईट चालू ठेवाव्यात. बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, नागरिकांनी सोशल मिडीयावर अफवा पसरवू नयेत तसेच घाबरून जाऊ नये, मात्र खबरदारी जरूर घ्यावी असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांनी केले आहे.

बळीराम क्यादर यांचे दु:खद निधन



नगर – तोफखाना येथील रहिवासी बळीराम एकनाथ क्यादर (वय ७४) यांचे १५ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली बेमुदत संप पुकारला आहे. यात महिला व सेवनिवृत्त कर्मचारीही मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. (छायाचित्रे : लहू दळवी)

छबुराव साळवे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – तारकपूर येथील रहिवासी छबुराव आनंदा साळवे (वय ८३) यांचे १७ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा दफनविधी बुऱ्हाणनगर कब्रस्तान स्मशानभूमी येथे करण्यात आला. त्यांच्या मागे पत्नी, २ विवाहित मुले, सुना, ४ विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सरोजकुमार व नाशिक धर्मप्रांताचे सचिव रॉबिन साळवे यांचे ते वडील होत.

अनुसयाबाई मोरगे यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर – शहरातील जुन्या पिढीतील अनुसया विश्वनाथ मोरगे (वय ९५) यांचे १४ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संगमनेर रोड, मोरगे मळ्यातील शेतकरी बबनराव मोरगे, राजेंद्र मोरगे व मोरगे वॉटर सप्लायर्सचे सतिष मोरगे आणि श्रीमती कलावती सप्रे, सौ. शिला आरगडे व सौ.शोभा गाढे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्यावर दत्तनगर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी संपावर; कामकाज ठप्प

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्मचारी सहभागी; जिल्हा न्यायालयात शांततेत निदर्शने

नगर – समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. या संपात अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १३०० न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले असून, जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी शांततेत निदर्शने करून आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली राज्यभर हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही या संपाला पाठिंबा दिला आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मंजूर करून महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावाला तब्बल २१ महिने उलटूनही शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ३१ जानेवारी २०२५ पासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप कर्मचारी महासंघाने केला आहे.

दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणी प्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करून वेतन देण्यात यावे, अशी कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. समान कामाच्या तत्त्वानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करून दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, अशी भूमिका महासंघाने घेतली आहे. उच्च न्यायालयाच्या समितीने प्रस्तावाला मान्यता देऊन तो शासनाकडे पाठविल्यानंतरही निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार

सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी वेळोवेळी शासनाकडे पत्रव्यवहार केला. तसेच काळ्या फिती लावून नियमित कामकाज करत निषेधही नोंदविला. मात्र, या आंदोलनांची आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची शासनाने दखल घेतली नसल्याने अखेर न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने अधिकृत शासन निर्णय (जीआर) जारी केल्याशिवाय बेमुदत संप मागे घेतला जाणार नाही, अशी ठाम भूमिका महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने घेतली आहे. मागणी मान्य होऊन शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

जिल्ह्यातील न्यायालयीन कामकाजावर परिणाम

राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी संपात सहभागी झाल्यामुळे न्यायालयीन काम काजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे १३०० कर्मचारी या संपात सहभागी झाल्याने जिल्ह्यातील न्यायालयीन काम काजही प्रभावित झाले आहे. शासनाने या मागणीवर तातडीने निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आंदोलनाला मिळाला पाठिंबा

याबाबतची माहिती अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, उपाध्यक्ष अतुल खरपुडे यांनी दिली. यावेळी प्रबंधक संदीप कडू, अविनाश लिपाने, अधीक्षक डी बी शिंदे, बी एम गुंजाळ, डी बी काकडे, अरुण शिंदे, आनंद सोनपसारे संगीता कोल्हे, सविता भालेराव, वैशाली बुऱ्हाडे, स्वाती क्षीरसागर, दादाभाऊ आंधळे, कुमुदिनी गायकवाड, बी. डी. शिंदे, ग्रीष्मा सोनसळे, श्रीपाद माचवे,रवींद्र घोडके, गणेश सब्बन, संतोष लयचेट्टी, सतिश ढवळे, उद्धव नरवडे, युवराज गुंजाळ, दिपक दुसुंगे व सर्व न्यायालयीन कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष हेमंत जोशी, अविनाश नगरकर, दयानंद अन्नदाते, अविनाश नगरकर, अशोक दहिफळे, गावडे मामा, श्री. संदुपटला, श्री. पोंदे, श्री. लांबदाडे, श्री. अन्नदाते, ज्ञानदेव धामणे, दत्तात्रय लोखंडे, शिके तरडे, रंगनाथ अवसारे व इतर सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

गृहिणी

आरोग्य

घरातील हवा शुद्ध ठेवण्यासाठी

घरातील हवा शुद्ध ठेवणे हे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत गरजेचे आहे कारण आपण दिवसातील जास्त वेळ घरातच घालवतो. जर घरातील हवा दूषित नसेल तर सर्दी, खोकला, दमा आणि थकवा यांसारखे आजार होऊ शकतात. हे टाळण्यासाठी काही सोपे उपाय दररोज केले पाहिजेत.सकाळी उठल्यावर सर्वात आधी घरातील सर्व खिडक्या आणि दारे किमान अर्धा तास उघडी ठेवा. रात्री बंद घरात कार्बन वायू साचलेला असतो तो बाहेर जाऊन ताजी आणि थंड हवा आत आली पाहिजे. दिवसभरातून दोन वेळा घरात हवा खेळती ठेवणे खूप चांगले असते. घरात जिवंत रोपे लावणे हा हवेतील विषारीपणा कमी करण्याचा सर्वात नैसर्गिक उपाय आहे. तुळस, कोरफड, नागवेलीचे पान आणि गोकर्णी सारखी रोपे हवेतील घाण शोषून घेतात आणि भरपूर प्राणवायू सोडतात. ही रोपे स्वयंपाकघर, बैठकीची खोली आणि शयनगृहात ठेवू शकता. स्वयंपाक करताना निघणारा धूर आणि तेलकट वाफ ही घरातील हवा खराब करण्याचे मोठे कारण आहे. त्यामुळे स्वयंपाक करताना खिडकी उघडी ठेवा आणि वरचा पंखा चालू ठेवा. तसेच स्नानगृहातील ओलसरपणा वेळेवर सुकवला नाही तर तेथे बुरशी तयार होते आणि दुर्गंधी येते. म्हणून स्नानगृह नेहमी कोरडे ठेवा. घरात सतत धूप, उदबत्ती, सुगंधी मेणबत्त्या आणि डासांसाठी धूर करणारी साधने वापरू नका. त्यातून निघणारा धूर डोळ्यांना आणि फ ुफ्फुसांना त्रास देतो. त्याऐवजी लिंबाची साल, कापूर किंवा नैसर्गिक फुले वापरून घर सुगंधी ठेवा.धूळ ही हवेतील अदृश्य शत्रू आहे. रोज झाडू मारल्यानंतर ओल्या फडक्याने फरशी पुसा. असे केल्यास घरातील हवा नेहमी शुद्ध, सुगंधी आणि आरोग्यदायी राहील.

पाककला

पुरी भाजी

साहित्य : गव्हाचे पीठ २ वाट्या, रवा २ चमचे, बटाटा ३ मध्यम उकडलेले, बारीक चिरलेला कांदा १ मध्यम, बारीक चिरलेला टोमॅटो १, हिरवी मिरची २ बारीक चिरलेली, आले १/२ इंच किसलेले, हळद १/४ चमचा, मोहरी १/२ चमचा, जिरे १/२ चमचा, कढीपत्ता ५-६ पाने, तेल तळण्यासाठी, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

कृती : उकडलेले बटाटे सोलून हाताने कुस्करून घ्या. कढईत २ चमचे तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, कढीपत्ता, हिरवी मिरची आणि आले घालून फोडणी करा. त्यात कांदा घालून परता, टोमॅटो, हळद घालून मिक्स करा. त्यात कुस्करलेले बटाटे, मीठ आणि थोडी कोथिंबीर घालून भाजी एकजीव करा. २-३ मिनिटे परतून भाजी तयार ठेवा. दुसऱ्या भांड्यात गव्हाचे पीठ, रवा, मीठ आणि १ चमचा तेल घालून घट्ट पीठ मळून घ्या. १५ मिनिटे झाकून ठेवा. पीठाचे छोटे गोळे करून जाडसर पुऱ्या लाटा. कढईत तेल गरम करून मध्यम आचेवर पुऱ्या दोन्ही बाजूने फुगून सोनेरी रंग येईपर्यंत तळा. तयार गरमागरम पुरी गरम बटाटा भाजी आणि लोणच्याबरोबर सर्व्ह करा.

वास्तू

वादविवाद होऊ नयेत म्हणून

* घराच्या ईशान्येला तुळस लावावी आणि संध्याकाळी तुळशीजवळ आणि देवघरात तुपाचा दिवा लावावा. यामुळे घरात नेहमी सकारात्मक ऊर्जा राहते आणि वादविवाद कमी होतात.

* घरात काचेच्या वस्तू, झुंबर किंवा फिश पॉट ईशान्य दिशेला ठेवल्याने सकारात्म क ऊर्जा वाढते. मुख्य दरवाजासमोर लाफिंग बुद्धा ठेवल्याने घरात आनंद टिकतो.

सौंदर्य

* डोळ्यांखाली काळी वर्तुळे असतील तर बटाट्याचा रस लावा.

* आवळा खाल्ल्याने केस काळे आणि दाट होतात.

सल्ला

* सॅलड कुरकुरीत राहण्यासाठी बर्फाच्या पाण्यात ठेवा.

* फोडणी देताना तेल तापले का ते पाहण्यासाठी जिरे टाका.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६

कूष्मांड नवमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, शतातारा ३०।११, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

राशिभविष्य

मेष : आज पैशाची आवक वाढेल. कामात मोठे यश मिळेल.

वृषभ : आज जुन्या मित्राची भेट होईल.

मिथुन : आज प्रवास घडण्याची शक्यता आहे. मनातील इच्छा पूर्ण होईल.

कर्क : आज कुटुंबासोबत वेळ जाईल. नवीन वस्तूची खरेदी होईल.

सिंह : आज मान सन्मान वाढेल. नोकरीत बढती मिळेल.

कन्या : आज अडकलेले काम पूर्ण होईल. जोडीदाराची साथ मिळेल.

तूळ : आज आरोग्य चांगले राहील. व्यवसायात लाभ होईल.

वृश्चिक : आज अचानक धनलाभ होईल. शत्रू दूर जातील.


धनु : आज शुभ वार्ता कानावर येईल. मुलांकडून आनंद मिळेल.

मकर : आज दिवस धावपळीचा जाईल. खर्चात वाढ होईल.

कुंभ : आज नातेवाईक भेटीस येतील. नवीन कामाची सुरुवात होईल.

मीन : आज मन प्रसन्न राहील. स्पर्धेत विजय मिळेल.

शब्दगंध क्र. ७५५७ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) जेथे कामगारांद्वारे वस्तू उत्पादित केल्या जातात ती जागा; फॅक्टरी ५) कापड; वस्त्र; वसन ७) निवारण करणारा; दूर सारणारा (संकट वगैरे) ८) वेस्ट इंडिज क्रिकेट संघाचा एक निवृत्त कप्तान तथा धडाकेबाज फलंदाज ९) परिणाम; फ्रूट १०) संकट; बलामत; अरिष्ट १२) आकाशात असलेल्या विमानाची स्थिती दर्शविणारे विमानतळावरील यंत्र १३) तूप (हिंदी, उर्दू) १४) ग्लानी; शीण; मरगळ १७) नमुनेदार; उदाहरणादाखल २०) एक दुचाकी वाहन २१) एक प्रकारचा दगड २२) वाईट सवय; खोड २३) धनुष्य; धनुष्याकृतीसारखे बांधकाम; महिरप

शब्दगंध क्र. ७५५६ चे उत्तर

ना	ना	सा	हे	ब	■	ल	■
पी	■	■	म	न	क	व	डा
क	ना	त	■	क	ळ	क	ळ
■	द	■	स	र	स	र	■
बा	र	मा	ही	■	■	■	पं
रा	■	न	■	वि	भा	ज	क
ख	ड	पा	■	ब	न	रा	ज
डी	■	न	ज	र	■	सा	■

उभे शब्द :- १) नवनाथांपैकी एक २) कणीदार; दाणेदार ३) झाडावर वगैरे इकडून तिकडे फिरणारा झुपकेदार शेपटी असलेला एक जीव ४) एक कीटक ५) भारताचे एक माजी व दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. +++ ६) ताटापेक्षा थोडे मोठे पसरट असलेले एक पात्र ११) कथेकरी; कीर्तनकार १२) गव्हाचे कणीदार पीठ १५) सैन्य वगैरेंचे शिस्तबद्ध संचलन १६) खा खा खाणारा १७) पती; स्वामी; धनी; नवरा १८) लिहिले जाणारे (लेख वगैरे) १९) जुने फाटके वस्त्र; चिरगूट; चिंधी २०) वर्ष; शक; झाडाची त्वचा; टरफल

* * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

सुविचार : बोलण्यापूर्वी ऐकावे, लिहिण्यापूर्वी विचार करावा, खर्च करण्यापूर्वी कमवावे.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

समुद्राच्या तळाशी अजूनही न सापडलेले प्राणी आहेत का?

समुद्राचा तळ हा माणसाच्या ज्ञानाच्या पलीकडचा एक प्रचंड आणि रहस्यमय प्रदेश आहे. आपण आकाशाकडे दुर्बिणीतून पाहून दूरवरच्या ताऱ्यांचा आणि ग्रहांचा शोध घेतला आहे पण आपल्याच पायाखालचा म्हणजेच आपल्या पृथ्वीवरील समुद्राचा खरा तळ आपण अजूनही नीट पाहू शकलो नाही. समुद्र हा पृथ्वीच्या जवळपास सत्तर टक्के भाग व्यापतो आणि त्यातील बहुतांश भाग हा हजारो हात खोल आहे. शास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की आपण समुद्राच्या पाच टक्क्यांहूनही कमी भागाचा व्यवस्थित अभ्यास केला आहे. उरलेला पंचाण्णव टक्के भाग अजूनही अनोळखी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तिथली परिस्थिती. दोन तीन हजार हातांनंतर सूर्याचा प्रकाश पूर्णपणे नाहीसा होतो आणि घनदाट काळोख पसरतो. तिथे पाण्याचा दाब इतका प्रचंड असतो की एखाद्या माणसाचे शरीर क्षणात चिरडले जाईल. तापमान बर्फासारखे थंड असते. अशा ठिकाणी माणसाला थेट जाणे शक्य नाही म्हणून खास यंत्रांच्या मदतीनेच थोडा थोडा शोध लागतो.

जेव्हा कधी अशी यंत्रे तळाशी गेली तेव्हा तिथे जीवसृष्टी नसावी असे वाटत होते पण उलटेच चित्र दिसले. तिथे जीवसृष्टी फुललेली होती पण ती आपल्या नेहमीच्या जीवसृष्टीपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. काही माशांच्या अंगावर स्वतःचाच प्रकाश निर्माण करण्याची देणगी आहे. ते अंधारात दिव्यासारखे चमकतात आणि त्याच प्रकाशाने आपले भक्ष्य शोधतात किंवा शत्रूला घाबरवतात. काही जीव काचेसारखे पारदर्शक असतात, त्यांच्या पोटातील अन्नही बाहेरून दिसते. काही जीवांना डोळेच नसतात कारण तिथे प्रकाशच नाही तर डोळ्यांचे कामच काय, ते कंपनातून आणि वासातून सर्व काही ओळखतात. काही जीवांचे दात सुयांसारखे लांब आणि वाकडे असतात, काहींचे तोंड त्यांच्या शरीरापेक्षाही मोठे असते. समुद्राच्या तळाशी काही ठिकाणी जमिनीतून गरम आणि रसायनयुक्त पाणी बाहेर येते, त्याला गरम झरे म्हणतात. तिथे तर असे जीव आढळले आहेत जे त्या विषारी रसायनांवरच जगतात, जे इतर कोणताही जीव सहन करू शकणार नाही.

आता प्रश्न असा आहे की असे किती जीव अजून सापडायचे बाकी आहेत. यावर अभ्यास करणाऱ्यांचे असे मत आहे की समुद्रात सापडायचे बाकी असलेल्या जीवांची संख्या लाखोंच्या घरात आहे. आपल्याला आज माहीत असलेले मासे, खेकडे, शिंपले, देवमासे हे तर वरच्या थरातील अगदी थोडे जीव आहेत. खरा खजिना तर अजून खोलवर दडलेला आहे. काही जीव इतके सूक्ष्म आहेत की ते डोळ्यांना दिसत नाहीत पण त्यांची संख्या कोट्यवधी आहे. तर काही जीव इतके मोठे आणि बलाढ्य असू शकतात की त्यांच्या अस्तित्वाच्या केवळ कथा ऐकायला मिळतात. अनेकदा मच्छीमारांच्या जाळ्यात असे मासे सापडतात जे याआधी कधीच पाहिलेले नसतात. यावरून हेच सिद्ध होते की समुद्राच्या तळाशी अजूनही न पाहिलेले, न ओळखलेले प्राणी नक्कीच आहेत.

या न सापडलेल्या प्राण्यांचे महत्त्व खूप मोठे आहे. त्यांच्यापासून आपल्याला नवीन औषधे मिळू शकतात, कारण असे जीव प्रचंड दाब आणि अंधारात टिकण्यासाठी त्यांच्या शरीरात वेगळी रसायने तयार करतात. त्या रसायनांचा उपयोग अनेक आजारांवर होऊ शकतो. तसेच पृथ्वीवर जीव कसा निर्माण झाला याचे उत्तरही कदाचित याच खोल तळातील जीवांकडून मिळेल. म्हणूनच समुद्राचा तळ हा केवळ पाणी आणि चिखल नाही तर तो न उलगडलेला जीवांचा खजिना आहे. जसजसे नवीन तंत्रज्ञान येईल, अधिक शक्तिशाली पाणबुड्या तयार होतील तसतसा हा खजिना हळूहळू आपल्यासमोर येईल आणि तेव्हा आपल्याला कळेल की आपल्याला माहीत असलेले जग किती छोटे आहे आणि न माहीत असलेले जग किती विशाल आणि अद्भुत आहे.

एकजुटीचे बळ

एका मोठ्या जंगलात एक वटवृक्ष होता. त्या वटवृक्षावर हजारो छोट्या मुंग्या राहायच्या. त्याच झाडाखाली एक मोठा हत्ती रोज झोपायला यायचा. हत्तीला त्या मुंग्या आवडत नव्हत्या. तो रोज आपल्या सोंडेने झाड हलवायचा, म्हणजे मुंग्यांची घरं पडायची, त्यांची अंडी खाली पडायची. मुंग्या खूप वैतागल्या. एक मुंगी म्हणाली, आपण इतक्या छोट्या, हत्ती इतका मोठा, आपण काय करणार?

त्यांची राणी म्हणाली, आपण एकटीने काहीच करू शकत नाही, पण आपण हजारो आहोत. दुसऱ्या दिवशी हत्ती परत झोपायला आला. राणीने इशारा केला. हजारो मुंग्या एकाच वेळी झाडावरून उतरल्या आणि हत्तीच्या अंगावर चढल्या. एकटी मुंगी चावली तर हत्तीला कळतही नाही, पण हजारो मुंग्या एकाच वेळी कानात, सोंडेत, पायावर चावू लागल्या तेव्हा हत्तीला वेड लागल्यासारखे झाले. हत्ती जोरात ओरडत जंगलातून पळून गेला आणि पुन्हा त्या वटवृक्षाखाली कधीच आला नाही. एकट्या मुंगीमध्ये ताकद नव्हती, पण हजारो मुंग्या एकत्र आल्या तेव्हा मोठ्या हत्तीलाही पळवून लावले.

बोध : मोठा शत्रू सुद्धा एकजुटीपुढे छोटा पडतो.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

प्रेमळपणाचा प्रम णापेक्षा नितांतरी अधिक प्रेमाने आत्मा परम ात्म्याच्या स्वाधीन होतो. लोखंडाकडे लोखंडी खिळे जसे आकर्षिले जातात तद्वत आत्मा परमेश्वराकडे ओढला जातो. हा दिव्य संगम आनंद एवढा मोठा असतो की त्याबाबत मनुष्य कल्पनाही करू शकत नाही. आत्मा जेव्हा परमात्म्यात लय होतो तेव्हा तो दिव्य आनंदाच्या अवस्थेत पोहोचतो.

येथे आपल्या मूळ स्थितीला आत्म्यावर आत्मा महानंदात प्राप्त होतो. स्वतंत्र झाल्याची त्याला जाणीव होते व ज्या समाधान व आनंदी अवस्थेस पोहोचतो. ही स्थिती म्हणजे बनोच दिसायच्या कामकाजातून सुट्टी साठी करणात त्या आनंदमयी अंतरीचा ज्योतिर्मय मंडलांची यात्रास्थितीतरे असते सृष्टीच्या वेली आम्ही आगळे कमालचे चंद देशो, आनंद व पवित्र्याची मौज मिळवितो. येथे (सचखंडात) आत्म्यानंतर आत्मा खालील मंडलातील दुःख, द्वेष, अकर्मण्ये व निराशा विसरून जातो. आता येथे कोणताही त्रास, दुःख अश्या भाणाची भीती नाही, सर्व काही प्रसन्नता, प्रेम आणि आनंदाने भरलेले असते. आत्मा सदैव परमेश्वराबरोबर आपल्या त्या दिव्याचा आनंद अनुभवतो. आम्हा जागृत होतो. येथे आम्ही अमर्यादित ज्ञान, अमरता, निस्वार्थ प्रेम, एकता व दिव्य आनंदाच्या अवस्थेत जातो. येथे आम्ही पूर्ण स्वागत वेतन अवस्थेत राहतो.

गिर्यारोहकांना हिमालयावर चढाई करण्यासाठी आपले ध्यान परिपूर्ण रीतीने लक्ष्याकडे ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे आम्हास देहबुद्धीच्या वर येण्यासाठी प्रयत्न करतांना आमच्या आत्म्याने लक्ष्यप्राप्तीकडेच ध्यान देणे भाग आहे. सहाव्या चक्रावर ध्यान करतांना मन आणि शरीराने आम्हाला अडथळा आणता कामा नये. आम्ही थोडी जरी हालचाल केली तर आमचे ध्यान (लक्ष) पांगले जाते.

आमच्या मनामध्ये विचार आले तरीसुद्धा आम चे ध्यान विचलीत होते. दिवसभर चोवीस तासात आमच्या मनात जे उलट-सुलट विचार येतात व दिवसभर आम्ही उलट-सुलट भाषण आणि कर्म करतो त्यामुळे आमच्या अंतरीय ध्यानाभ्यासामध्ये फार मोठा अडथळा येतो.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

जेव्हा कुटुंबातील इतर व्यक्ती आपल्यापेक्षा जास्त चांगल्या गोष्टी करतात किंवा त्यांची नाती चांगली असतात, तेव्हा आपण त्यांच्या तुलनेत, त्यांची करायला हवी, जर आपल्याला त्यांच्याबद्दल मत्सर निर्माण झाला किंवा त्यांच्यापेक्षा निकृष्ट वाटलं तर आपण त्यांना नकारात्मक ऊर्जा पाठवत आहोत. आपल्या क्षमतेनुसार सर्वोत्तम करण्याचा आणि सर्वोत्तम कर्म करण्याचा आपला हेतू असायला हवा, आपल्या क्षमतेनुसार, आणि कोणत्याही लोकांशी कोणी आणि इतरांशी तुलना न करता, स्वतःच्या क्षमतेनुसार करणं आणि इतरांशी तुलना करण्याची स्वतःची त्यात अंतर्भूत असून त्यांचं करणं नका, जीवनाचा हेतू आपला इतरांपेक्षा चांगलं बनावं असा नसावा तर आपण स्वतःच सर्वोत्तम बनावं, हा असायला हवा.इतरांपेक्षा चांगलं बनण्याची इच्छा ठेवणं ही न संपणारी स्पर्धा आहे, जेथून कधीतरी

नाती घट्ट विणू या

आपल्यापेक्षा पुढे असेल त्यापुढे आपण कधीच आनंदी होणार नाही, स्पर्धेच्या भावनेतून मीपणा, मान, संताप, असुरक्षितता आणि मत्सर या भावनाही निर्माण होतात. प्रत्येक आत्म्याचं व्यावसायिक यश, आरोग्य, नाती आणि इतर गोष्टी त्याच्या पूर्व कार्मिक खात्याने प्रमाणित असतात, त्यामुळे फक्त वर्तम नातील कर्मावरून त्याला पारखता येत नाही. दोन आत्म्यांचे वर्तमानातील मापदंड जरी सारखे असले तरी त्यांच्यातील तुलना आणि स्पर्धा अप्रायोगिक आहे, याचं कारण दोन्ही आत्म्यांची पूर्वजन्मातील कर्मे वेगवेगळी आहेत.

सुरेश ओबेरॉय : आपल्या कार्मिक खात्याची सुरुवात आपला जन्म झाल्यावर होते की आपल्या कार्मिक खात्यामुळेच आपला त्या कुटुंबात जन्म होतो?

शिवानीदीदी : पूर्वी ज्या आत्म्यांबरोबर आपण ऊर्जेची देवाण-घेवाण केलेली असते त्यांच्या बरोबर आपलं कार्मिक खातं तयार होतं. वर्तमानात आपण त्यांच्याकडे आपले आईवडील, जोडीदार, मुलं, कुटुंब आणि मित्र या भूमिकांच्या लेबलमधून बघतो. जर आपण ती लेबल्स काढून टाकली तर काय शिल्लक राहील? केवळ मी, एक आत्मा - माझी त्यांच्या आत्म्यांबरोबर झालेली ऊर्जेची देवाण-घेवाण उरेल. काही आत्म्यांबरोबर सामंजस्यपूर्ण ऊर्जे ची देवाण-घेवाण होईल. तर काही आत्म्यांबरोबर परस्पर वादविवाद आणि ताळमेळाचा अभाव असेल. कित्येकदा आपल्याला एखाद्या विशिष्ट व्यक्तीसाठी खूप काही करायची इच्छा असते, पण त्यांच्याकडून आपल्याला तसा प्रतिसाद मिळत नाही. (क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : परीक्षेत नापास झाल्यावर काय करशील?

विद्यार्थी : तुम्ही शिकवलंय, अपयश हीच यशाची पहिली पायरी, मी पुन्हा त्याच पायरीवर उभा राहीन.

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* उत्तर ध्रुवावर पोहोचणारा पहिला मानव कोण?

- रॉबर्ट पिअरी

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

या महिन्यात बाळाचे सर्व अवयव, इंद्रिये दिसायला लागतात. या महिन्यात दोन हात, दोन पाय, डोके असे गर्भाचे पाच भाग दिसायला लागतात. या महिन्यात आपण आपल्या बाळाचे ठोके ऐकू शकतो.

गर्भ वजन - १४ ग्रॅम असते.

चौथा महिना : चतुर्थे मासि स्थिरत्वं आपद्यते गर्भ तस्मात् तदा गर्भिणी गुरुगात्रत्वं अधिकं आपद्येत विशेषेण ।या महिन्यामध्ये गर्भाचे सर्व अवयव तयार झालेले असतात. या महिन्यात बाळ त्याच्या हाता-पायांच्या साहाय्याने पोहण्याची कृती करतो. बाळाची त्वचा गुलाबी पारदर्शक असते. गर्भनाळ चांगल्या प्रकारे तयार होऊन त्यातून बाळाचे पोषण होते. बाळाची वार पूर्ण तयार होते. गर्भलांबी ६ ते ७ इंच, गर्भ वजन - १०० ग्रॅम.पाचवा महिना :पंचमे मासि गर्भस्य मांसशोणितपचयो भवति अधिकं अन्येभ्यो मासेभ्य: तस्मादत्ता गर्भिणी काश्यं मापद्यते विशेषेण ।।या महिन्यामध्ये सप्तधातूंपैकी मांस व रक्त या दोन धातूंची अधिक वाढ होते. तसेच या म हिन्यात बाळाला बुद्धी प्राप्त होते; म्हणून या महिन्यात बाळाशी सुसंवाद, संगीत ऐकणे, ॐकार या गोष्टी कराव्यात. तसेच गर्भिणीला काही खाण्याची इच्छा झाल्यास त्या घरातील सदस्यांनी पूर्ण कराव्यात, कारण या महिन्यात गर्भवतीला अशक्तपणा जास्त जाणवतो; परंतु कुठल्याही गोष्टीचा अतिरेक असू नये. या महिन्यात बाळ चांगलेच कृतीशील बनते.

आईला बाळाची हालचाल चांगल्या प्रकारे जाणवते. बोटे, नखे यांची पूर्णपणे वाढ होते. या महिन्यात बरीच वाढ झालेली असते. सहाव्या महिन्यात गर्भाचे बल व वर्ण ही रूपे व्यक्त होतात; त्यामुळे गर्भाची शक्ती वाढेल, गर्भ बलवान होईल व आपले बाळ निरोगी जन्माला येईल.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



साईबन कृषी पर्यटन क्षेत्र येथे हुर्डा महोत्सवाचे उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी आदी.

हुर्डा महोत्सव ही तर आपली संस्कृती

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे प्रतिपादन; साईबन कृषी पर्यटन येथे उद्घाटन

नगर – हुरडा महोत्सव ही आपली संस्कृती आहे. हुरडा आरोग्यासाठी तर उत्तम आहेच परंतु त्यामुळे एकोपा वाढतो तसेच स्नेहाच्या धाग्याची वीण अधिक घट्ट होते. साईबन चा हुरडा स्पेशल आहे. तो चवदार व कोवळा तर आहेच आहे परंतु दरवर्षी सर्वात पहिल्यांदा त्याचा शुभारंभ करण्याचा मानही साईबनला जातो,असे प्रतिपादन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी यांनी केले. साईबन येथे हुरडा महोत्सवा बरोबरच अनेक पर्यावरण पूरक व मनाला आनंद देणारे नैसर्गिक दालने आहेत. संस्कृतीचे संवर्धन करणारा पपेट शो, बोटिंग, झिप लाईन तसेच नक्षत्र उद्यान, बटरफ्लाय गार्डनचाही आनंद येथे घेता येतो. नगरकरांनी याचा नक्कीच आनंद घ्यायला हवा, असे ते म्हणाले.

एम.आय.डी.सी. परिसरातील साईबन कृषी पर्यटन क्षेत्र येथे हुर्डा महोत्सवाचे उद्घाटन झाले. पर्यावरण पूरक शेगडी द्वारे हुरड्याचे कणीस भाजून उद्घाटन करण्यात आले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी, डेप्युटी कलेक्टर मनीषा राशिनकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नाना जाधव, महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, साईबनचे संचालक मालक डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया तसेच डॉ. वर्धमान व डॉ. श्रुतिका कांकरिया सहित बालगोपाळ उपस्थित होते.

नाना जाधव म्हणाले की, माणसाकडे संपत्ती असणे आणि ती केवळ स्वतःच्या समृद्धीसाठी वापरणे ही आजच्या काळात फारशी नवीन गोष्ट राहिलेली नाही; पण मिळालेल्या संपत्तीचा आणि कर्तृत्वाचा मोठा हिस्सा समाजातील वंचितांसाठी, अंधांसाठी आणि दुष्काळग्रस्तांसाठी आनंदाने अर्पण करणारी मोजकीच व्यक्तिमत्त्वे समाजात पाहायला मिळतात. डॉ. प्रकाश कांकरिया तसेच आपल्या समाजकार्याच्या तपश्चर्येमुळे आंतरराष्ट्रीय नोबल पीस अवॉर्ड साठी ज्यांचे नामांकन झालेले आहे अशा डॉ. सौ. सुधा कांकरिया हे या मोजक्या आणि सुवर्णमयी व्यक्तिमत्त्वांपैकी एक दांपत्य आहे. आज डॉ. प्रकाश कांकरिया यांचा ७१ वा वाढदिवस अहिल्यानगरातील 'साईबन कृषी पर्यटन केंद्रात' अतिशय साधे, पण मानवतावादी मूल्यांचा सुगंध पसरवणारा असा भव्य आणि प्रेरणादायी सोहळा म्हणून संपन्न झाला.

कृषी अधिकारी सुधाकर बोराळे म्हणाले की सध्या दुष्काळाचे वातावरण आहे त्यामुळे शेतकरी बंधूंना प्रोत्साहित करण्यासाठी जास्तीत जास्त व्यक्तींनी हुर्डा महोत्सवात सहभागी व्हावे. कडधान्यांमध्ये हुर्डा हा राजा आहे. त्याचे अनेक गुणधर्म आरोग्यासाठी उत्तम व संस्कृतीची उन्नती करणारे आहेत. महापौर ज्योती गाडे यांचे शुभेच्छापर भाषण झाले.

आपल्या सत्काराला उत्तर देताना राष्ट्रीय दृष्टीहिन संघ महाराष्ट्रचे महासचिव श्री. जाधव म्हणाले की, डॉ. कांकरिया परिवाराने दिलेल्या भूदानाचे आम्ही सोने करू. त्या जागेवर लवकरच अंध बांधवांना आत्मनिर्भर करण्यासाठीचे अनेक प्रकल्प तसेच भविष्यात वृद्धाश्रमाचेही नियोजन करण्यात येईल. डॉ. कांकरिया परिवाराचे हे ऋण आम्ही कधीही फेडू शकणार नाही.

सुरुवातीस डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले व डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक लाख ७१ हजार रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा धनादेश तसेच राष्ट्रीय दृष्टीहिन संघ महाराष्ट्रला दहा गुंठे जमीन भूदान व 'साईसूर्य दृष्टीसेवा जीवनगौरव पुरस्कार' तसेच अनाम प्रेम संस्थेला ११,००० रुपये चा धनादेश व 'मानकऱ्हैय्या दृष्टीप्रेम सन्मान' दिल्याची घोषणा केली. डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या वाढदिवसानिमित्त औक्षण व केक कटिंगचा कार्यक्रम झाला. हुर्डा पार्टी, वनभोजन, गप्पागोष्टी, गीत-संगीताची मेजवानी अशी दिलखुलास धमाल करीत नगरकरांनी एक आगळा-वेगळा आनंद उत्सव साजरा केला.


डॉ. वर्धमान कांकरिया यांनी आभार मानले.

प्रेरणादायी अक्षरधन

नेतृत्व कसे असावे?

"मुसाफिर" वाचनीय मननीय पे रू णा दा यी अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स



ऋग्वेदाच्या गृत्समद ऋषी नेतृत्वाची स्तुती करतो.

अश्मास्यमवतं
ब्रम्हणस्पतिर्मधुदारमभि
शमोजसातृणत तमेव
विश्वे पपिरे स्र्हशो
बहुसाकं सिसिचुरुत्समुद्रिणम ।।

वेदकाळी तो एक मानवजातींचा नेता म्हणाला, मधाचा झरा कुठे आहे ते कळले आहे. सगळ्या मानवाच्या कल्याणासाठी तो मधाचा झरा झुळझुळ वाहिला पाहिजे. तो काय? त्या झऱ्याचे तोंड बंद्र, एक प्रचंड शिळा फोडली. मधाची धार उसळून वर आली. सामान्यजन भराभर तो मध प्राशन करू लागले. जनता तृप्त झाली. जनतेच्या डोळ्यांत स्वर्गीय आनंद जाणवू लागला. सुखाचे पाझर, आनंदाचे निर्झर युगायुगाची अशांत तहान शमली. मग सर्वदूर त्या सुखसमृद्धीचे, त्या नेत्याने सिंचन केले. कुणीही वंचित राहिला नाही. त्या स्वर्गीय आनंदाच्या सोतापासून.

नेतृत्व असावे, तर असे. आपल्या संस्कृतीतील नेतृत्वाने संपूर्ण मानवजातीच्या सुखांचा व समृद्धीचा ध्यास घेतला होता. मधाचे कुंभ स्वत:पाशी आणि सामान्य माणसे मात्र उपाशी, असा भ्रष्ट विचार त्या नेतृत्वाला कधी शिवलाच नाही. नेतृत्व श्रमशील व मानवहितदक्ष, सच्छिल हवे. केवळ वल्गना केल्याने कुणाचे पोट भरणार आहे ?

संत नामदेव म्हणतात.

बोलाचे पै मांडे क्षीर घरी अन्न
तेणे समाधान केदि होय ?

तोडाने मांडे, म्हटले की उपाशी माणसाचे समाधान झाले. असे कधी घडले ? शब्दांचे मांडे नकोत. कृतीचे हवेत.

बोलिल्यासारिखे न करी पामर ।
वृथाचि कुरकूर वाढविली ।।

बोलल्याप्रमाणे कृती केली नाही, तर प्रजेत असंतोष वाढेल. माणसाची कुरकूर शिगेला पोचेल.

नामा म्हणे त्याच्या संगे स्थिति घेषे। झाला लाभ नासे तेथे आता।

केवळ बुडबुडणाऱ्या नेत्यामुळे परिस्थिती बिघडेल. काही थोडा लाभ झालेला असेल, तर तोही नासेल, जसे विचार, तसे आचार हवेत नेतृत्वाचे. तसे नसेल तर परिस्थिती बिघडतेच, पण प्रजाही लाचार होते.

वात्रट नेतृत्व लाचार प्रजाजन यांची एक कहाणी विक्टोरिअन युगातील वाङमयात आढळते. ती भारतीय पेहेरावात कदाचित अधिकच खुलते.

एकदा एक नेता डाक बंगल्यावर उतरला. सकाळी त्याचे भुकेले भक्त बाहेर गोळा झाले. नेता उशिरा उठला. बाहेर आला, तो पायाला भले मोठे बँडेज बांधीत. लाचार भक्तजन नेत्याची ती अवस्था पाहून हळहळले. एकाने विचारले, साहेब काय झालं पायाला ?

नेता म्हणाला, पायात काटा गेला.

भक्त म्हणाले, पायात काटा केव्हा गेला ? नेता म्हणाला, रात्री.

रात्री ? रात्री कुठं गेला होतात ?

नेत्याने भुवया आखडल्या असे अडचणीत टाकणारे प्रश्न विचारता? त्या भुवईने भक्तांना झोडपले. लगेच संभाषण बदलले.

अरेरे, तुमच्याच पायात काटा जावा ? त्या काट्याला आमचे पाय नाही दिसले? तुम्ही नीट पाहिले नाही का चालताना ?

काटा वाटेत नाही, तर झोपेत रुतला.

स्वप्नात.

मित्र हो, स्वप्नात काटा रुतला, तर काय जागेपणी पायाला बँडेज बांधायचे? मूर्ख, वेडपट नेतृत्व पाहून अनुयायांनी तरी नाही का त्याला खडसावयाचे? छे, लाचार जनता उलट स्वतः ही आणखी वेडेचार करते. त्याचे ते भक्त त्याला म्हणाले, अरेरे। झोपेत काटा रुतला ? साहेब, तरी आम्ही तुम्हाला सांगत होतोच की झोपताना पायात जोडे घालत जा म्हणून.

ऐसीयांशी पांडुरंगे पंढरीसी कैसे न्यावे संगे?

– किशोर गांधी

नगरमध्ये १८ नोव्हेंबर रोजी निवृत्तीवेतनधारकांसाठी 'डिजिटल जीवन प्रमाणपत्र' कार्यशाळेचे आयोजन

नगर – अहिल्यानगर जिल्हा कोषागार कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल जीवन प्रमाणपत्र (Digital Life Certificate) सादर करण्याच्या प्रक्रियेची माहिती व प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठी १८ नोव्हेंबर रोजी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

निवृत्तीवेतनधारकांना दरवर्षी हयातीचा दाखला अर्थात जीवन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया अधिक सुलभ, सोयीस्कर आणि तंत्रज्ञानाधारित व्हावी, यासाठी केंद्र शासनाच्या 'जीवन प्रमाण' (Jeevan Pramaan) प्रणालीद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या सुविधेच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारकांना स्मार्टफोनचा वापर करून चेहरा प्रमाणीकरण (Face Authentication) प्रक्रियेद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करता येते. यासाठी https://jeevanpramaan.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच Jeevan Pramaan Face App आणि Aadhaar Face RD या मोबाईल ॲपच्या सहाय्याने ही प्रक्रिया पूर्ण करता येते.

विशेष कार्यशाळेमध्ये डिजिटल जीवन प्रमाणपत्र म्हणजे काय, ते ऑनलाइन कसे सादर करावे, स्मार्टफोनमध्ये आवश्यक मोबाईल ॲप कसे डाउनलोड करावेत, आधार क्रमांकाच्या आधारे नोंदणी कशी करावी आणि चेहरा प्रमाणीकरणाद्वारे जीवन प्रमाणपत्र कसे तयार करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे निवृत्तीवेतनधारकांना प्रत्यक्ष प्रक्रिया समजून घेण्यास मदत होणार आहे.

डिजिटल पद्धतीने जीवन प्रमाणपत्र सादर करण्याच्या सुविधेमुळे निवृत्तीवेतनधारकांचा वेळ आणि श्रम वाचण्यास मदत होते. तसेच संबंधित कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता कमी होऊन ही प्रक्रिया अधिक सुलभ होते.

या कार्यशाळेस अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक तसेच पेन्शनर्स संघटनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

मल्हार लेगसी ऑटोरायडर्सच्या माध्यमातून तीन दिग्गज ब्रँड एकाच छताखाली दाखल

दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर तब्बल २५ दुचाकींची विक्रमी विक्री



या शोरूममध्ये आधुनिक जावा ४२, रुबाबदार बॉबर, दमदार रोडस्टर, साहसी स्वारीसाठी येझदी ॲडव्हेंचर आणि शक्तिशाली बीएसए ६५० यांसारख्या आकर्षक मॉडेल्सची मेजवानी उपलब्ध आहे. पारंपरिक रचना, आधुनिक तंत्रज्ञान, दमदार कामगिरी आणि आकर्षक स्वरूप यामुळे या दुचाकी तरुणांसह जुन्या दुचाकीप्रेमींच्याही पसंतीस उतरणाऱ्या असून येथे सेवा केंद्रही उपलब्ध करून देण्यात आले आहे.

आपल्या स्वप्नातील दुचाकी पाहण्यासाठी, तिची वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी आणि प्रत्यक्ष चालवून पाहण्याचा अनुभव घेण्यासाठी ग्राहकांनी आरती हॉटेल शेजारी, निशा पॅलेसजवळ, नगर-पुणे रस्ता, केडगाव, अहिल्यानगर येथील मल्हार लेगसी ऑटोरायडर्स या शोरूमला भेट द्यावी किंवा अधिक माहितीसाठी ९८५०७२५८८८ आणि ७०२०००३४२९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नगर – काही दुचाकी केवळ रस्त्यावर धावत नाहीत, तर त्या लाखो चाहत्यांच्या मनावर राज्य करतात. पिढ्यान्पिढ्या दुचाकी प्रेमींच्या मनात घर करून राहिलेल्या जावा, येझदी आणि बीएसए या तीन दिग्गज नाममुद्रांचा आता नगर शहरात प्रथमच एकाच छताखाली प्रवेश झाला असून क्लासिक दुचाकींचा रुबाब, दमदार इंजिनची ताकद आणि शाही स्वारीचा अनुभव आता थेट अहिल्यानगरकरांना मिळणार आहे. केडगाव येथील मल्हार लेगसी ऑटोरायडर्स या शोरूमच्या माध्यमातून दुचाकीप्रेमींसाठी ही खास पर्वणी उपलब्ध झाली असून दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर तब्बल २५ दुचाकींची विक्रमी विक्री झाली आहे.



दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसीतील महिंद्रा सबलोक शोरूमने एकाच दिवशी तब्बल ६५ वाहनांच्या विक्रीचा विक्रम नोंदवत ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविला आहे.

दिवाळी पाडव्याला 'महिंद्रा सबलोक'मध्ये ६५ वाहनांची विक्री

नगर – दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसीतील महिंद्रा सबलोक शोरूमने एकाच दिवशी तब्बल ६५ वाहनांच्या विक्रीचा विक्रम नोंदवत ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविला आहे. महिंद्राच्या इलेक्ट्रिक, पेट्रोल आणि डिझेल अशा तिन्ही प्रकारच्या वाहनांच्या खरेदीलाप्रतिसाद मिळाला असून स्कॉर्पिओ, थार आणि एक्सयूव्ही मालिकेतील वाहनांना विशेष मागणी होती. पारंपरिक पद्धतीने वाहनपूजन करून ढोल-ताशांच्या गजरात नवीन वाहनांचे वितरण करण्यात आले.

यावेळी सबलोक शोरूमचे महाव्यवस्थापक बाबासाहेब दारकुंडे यांनी सांगितले की, दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर आमच्या शोरूममधून एकाच दिवशी ६५ वाहनांची विक्रमी विक्री झाली ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांनी ग्राहकांचे मनःपूर्वक आभार मानले.

'आजादी की कीमत' सिंधी नाटकास नागरिकांचा प्रतिसाद

धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांतून संत कंवरराम यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

नगर – शहीद संत कंवरराम यांच्या ७६ व्या पुण्यतिथीनिमित्त सिंध हिंद सेवा मंडळ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अहिल्यानगरमध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त माऊली सभागृहात झालेल्या 'आजादी की कीमत' या देशाच्या फाळणीवर आधारित राष्ट्रभक्तिपर नाटकास सिंधी समाजातील नागरिकांनी प्रतिसाद देत उपस्थिती लावली.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीचे सदस्य दामोदर बठेजा व सहाय्यक संचालक सचिन निंबाळकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष किशन पंजवानी, उपाध्यक्ष चेलाराम राजाणी, सेक्रेटरी सीए. शंकर अंदानी, खजिनदार द्वारकादास किंगर यांच्यासह ट्रस्टी उपस्थित होते.

देशाच्या फाळणीनंतर सिंधी समाजाने केलेला संघर्ष, सहन केलेले अत्याचार आणि स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान यांचे वास्तववादी चित्रण 'आजादी की कीमत' या नाटकातून साकारण्यात आले. फाळणीच्या वेदनादायी प्रसंगांचे सादरीकरण कलाकारांनी अभिनयातून सादर केले. राष्ट्रभक्तीची भावना जागृत करणाऱ्या या नाट्यप्रयोगाने उपस्थितांना भाऊक केले.



सिंध हिंद सेवा मंडळाच्या वतीने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करताना महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीचे सदस्य दामोदर बठेजा व सहाय्यक संचालक सचिन निंबाळकर. समवेत ट्रस्टचे अध्यक्ष किशन पंजवानी, उपाध्यक्ष चेलाराम राजाणी, सेक्रेटरी सीए. शंकर अंदानी, खजिनदार द्वारकादास किंगर व सदस्य.

यावेळी बोलताना दामोदर बठेजा म्हणाले, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीच्या माध्यमातून राज्यभर विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. नगरमध्येही या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. 'आजादी की कीमत' या सिंधी नाटकाच्या प्रयोगाचे आयोजन व सिंध हिंद सेवा मंडळाच्या विविध उपक्रमांना नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे.

प्रास्ताविकात सीए. शंकर अंदानी म्हणाले, ट्रस्टच्या वतीने शहीद संत कंवरराम यांची पुण्यतिथी भक्तिभावाने साजरी करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीच्या सहकार्याने सादर झालेल्या 'आजादी की कीमत' या राष्ट्रभक्तिपर सिंधी नाटकामुळे समाजातील नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीबरोबरच सिंधी संस्कृती व परंपरेविषयी प्रेम आणि अभिमान निर्माण होण्यास मदत झाली आहे.

दरम्यान, शहीद संत कंवरराम यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथील संत कंवरराम धर्मशाळेत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुखमनी पाठ व प्रार्थना करण्यात आली. तसेच भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिमय वातावरणात संत कंवरराम यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी सिंध हिंद सेवा मंडळाचे भागचंद रायसिंघानी, ओम कुकरेजा, राहुल बजाज, नानक राजाणी, अशोक रोहिडा, जितेश सचदेव, कन्हैया तोलानी, भरत कुकरेजा, सागर बठेजा, राम बालानी, मोहन कुकरेजा, सुशील रामनानी, रमेश कुकरेजा, अमित टेकवाणी, सनी बालानी, भगवान बालानी, मुकेश असनानी, गगन कुकरेजा आदींसह नागरिक उपस्थित होते.



पिपाडा किया शोरूमने एकाच दिवशी १११ हून अधिक गाड्यांची विक्री करून यश संपादन केले आहे.

दिवाळी पाडव्याला 'पिपाडा किया'मध्ये १११ हून अधिक गाड्यांची विक्री

नगर – दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर अहिल्यानगरच्या एमआयडीसी येथील पिपाडा किया शोरूमने एकाच दिवशी १११ हून अधिक गाड्यांची विक्री करून यश संपादन केले आहे. ग्राहकांचा प्रतिसाद आणि विश्वासाच्या बळावर पिपाडा कियाने विक्रीचा नवा उच्चांक गाठत वाहन क्षेत्रात आपली छाप उमटवली आहे. किया कंपनीच्या सेल्टोस, सोनेट, सिरॉस, कॅरेन्स, कॅरेन्स क्लॅव्हिस, कार्निव्हल आणि इलेक्ट्रिक या आकर्षक मॉडेल्सना ग्राहकांची विशेष पसंती मिळाली. पेट्रोल, डिझेल तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या विविध पर्यायांमुळे ग्राहकांना आपल्या गरजेनुसार गाडी निवडण्याची संधी मिळाली.

महाव्यवस्थापक संजय चक्रे यांनी सांगितले की, ग्राहकांचे समाधान आणि विश्वास हेच पिपाडा कियाचे खरे यश असून दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर १११ हून अधिक गाड्यांची विक्री होणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे आणि ग्राहकांनी दाखवलेला विश्वास आमच्यासाठी प्रेरणादायी आहे.

विक्री व्यवस्थापक गणेश गांगर्डे यांनी सांगितले की, एकाच दिवशी एवढ्या मोठ्या संख्येने वाहनांची विक्री आणि ग्राहकांना गाड्यांचे वितरण करणे हे मोठे आव्हान होते, मात्र विक्री पथकाचे नियोजन, कर्मचाऱ्यांचे परिश्रम आणि ग्राहकांचा प्रतिसाद यामुळे हे यश शक्य झाले असून प्रत्येक ग्राहकाला उत्तम सेवा देण्यासाठी आमचा चमू कटिबद्ध आहे. दिवाळी पाडव्याच्या दिनी नव्या गाडीची चावी हाती मिळताच ग्राहकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता आणि अनेक कुटुंबांसाठी नव्या गाडीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवणारा हा दिवस ठरला. १११ हून अधिक गाड्यांच्या विक्रीचा हा टप्पा म्हणजे केवळ विक्रीचा आकडा नसून पिपाडा कियावर ग्राहकांनी दाखवलेल्या विश्वासाची पावती ठरली.



वस्तू परत करतांना सौ. नायकू दिपाली व घेताना श्री. व सौ. गंगाराम शिंदे, संस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा.चेअरमन नितीन शिंगवी, संचालक कांतीलाल बोरा, किरण पतके व व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व अधिकारी, कर्मचारी.

महेश नागरी पतसंस्थेच्या सभासद व कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे सोन्याची वस्तू मूळ मालकास परत

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, येथील लॉकर्स खातेदार शिंदे गंगाराम आनंदा यांचे लॉकर्स मधून वस्तू काढताना नजर चुकीने साधारणतः एक लाख रुपये किमतीचे दागिने लॉकर्स रूम मध्ये पडले होते तद्नंतर थोड्या वेळाने सौ. नायकू दिपाली या देखील लॉकर्स मध्ये त्यांच्या कामासाठी गेल्या तेव्हा त्यांना सदर वस्तू सापडल्या त्या त्यांनी प्रामाणिकपणे लॉकर्स प्रमुख अधिकारी सौ. चंदा धुमाळ यांच्या ताब्यात दिल्या नंतर सदर वस्तू व्यवस्थापक व चेअरमन यांच्याकडे दाखविण्यात आल्या. त्यावेळेस त्या दिवशी आलेल्या सर्व लॉकर्स खातेदारांना बोलावून कोणाची वस्तू नजर चुकीने पडली का? त्यावर शिंदे गंगाराम यांनी त्यांची वस्तू पडल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा.चेअरमन नितीन शिंगवी, संचालक कांतीलाल बोरा, किरण पतके व व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व अधिकारी, कर्मचारी यांच्या समोर ज्यांना वस्तू सापडली त्यांना व ज्यांची वस्तू होती त्यांना बोलावून त्यांचा सत्कार करून मूळ मालकाला सदर वस्तू परत केली.

राजू डाके व उमेश गिरमे यांच्या प्रामाणिकपणाचा गौरव

संचालक प्रा. माणिकराव विधाते यांचे उद्गार; मौल्यवान वस्तू ग्राहकांना सुरक्षितपणे परत केल्याबद्दल शहर सहकारी बँकेच्यावतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार



मौल्यवान वस्तू ग्राहकांना सुरक्षितपणे परत केल्याबद्दल शहर सहकारी बँकेतील राजू डाके व उमेश गिरमे यांच्या प्रामाणिकपणाचा गौरव बँकेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – अहमदनगर शहर सहकारी बँकेतील अधिकारी व कर्मचारी नेहमीच ग्राहकांना उत्तम बँकिंग सुविधा देण्याचा प्रयत्न करतात. ग्राहकांशी चांगला संवाद ठेवत ज्येष्ठ नागरिकांपासून ते युवक खातेदारांपर्यंत सर्वांशी ऋणानुबंध निर्माण केले आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या मनात शहर सहकारी बँकेबद्दल आपुलकी आणि विश्वास निर्माण झाला आहे, असे प्रतिपादन बँकेचे माजी व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते यांनी केले.

अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या सावेडी शाखेतील कर्मचारी राजू डाके आणि नवीपेठ शाखेतील कर्मचारी उमेश गिरमे यांनी दैनंदिन कामकाजादरम्यान ग्राहकांच्या मौल्यवान वस्तू बँकेत विसरून राहिल्याचे निदर्शनास आणून दिले. संबंधित ग्राहकांची ओळख पटवून त्यांनी त्या वस्तू प्रामाणिकपणे ग्राहकांना परत केल्या. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल बँकेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी प्रा. विधाते म्हणाले की, प्रामाणिकपणा हा प्रत्येक मनुष्याच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा गुण आहे. बँकेतील कर्मचारी केवळ आर्थिक व्यवहारच सांभाळत नाहीत, तर आपल्या वागणुकीतून आणि प्रामाणिक सेवेतून ग्राहकांचा विश्वासही संपादन करतात. राजू डाके आणि उमेश गिरमे यांनी दाखविलेला प्रामाणिकपणा कौतुकास्पद असून, त्यांच्या कृतीतून इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळेल.

यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे यांनीही राजू डाके व उमेश गिरमे यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले.

याप्रसंगी राजू डाके व उमेश गिरमे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना बँकेचे माजी व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे, वरिष्ठ अधिकारी प्रकाश वैरागर, राजेंद्र गायकवाड, नवीपेठ शाखेचे शाखाधिकारी पराग चावक, कनिष्ठ अधिकारी रघुनाथ शुक्ल, ऋषिकेश ब्रह्मे आदींसह बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'एक कुटुंब, एक किल्ला' महास्पर्धेत विद्यार्थ्यांनी साकारले ऐतिहासिक गड-किल्ले

उत्कृष्ट किल्ले बनविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान; प्रथम व द्वितीय क्रमांकासाठी सायकल, तृतीय क्रमांकाला स्मार्टवॉच



अहिल्यानगर महानगरपालिका व धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान यांच्या वतीने बुरुडगाव रोड येथील साई उद्यानात आयोजित 'एक कुटुंब, एक किल्ला' महास्पर्धा झाली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती साकारल्या. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका व धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान यांच्या वतीने बुरुडगाव रोड येथील साई उद्यानात आयोजित 'एक कुटुंब, एक किल्ला' महास्पर्धा झाली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या हुबेहूब प्रतिकृती साकारल्या. उत्कृष्ट किल्ले बनविणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असल्याचे प्रतिपादन माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केले.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शालेय विद्यार्थी मैदानी खेळांपासून दूर जाऊन मोबाईल आणि टीव्हीकडे आकर्षित होत आहेत. दीपावलीच्या सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, तसेच त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची ओळख व्हावी, यासाठी किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून महाराजांचे शौर्य, पराक्रम आणि ऐतिहासिक वारसा समजण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांनी आपण तयार करीत असलेल्या किल्ल्याची संपूर्ण माहिती जाणून घेणे आवश्यक आहे. त्या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्या पद्धतीने नियोजन केले होते, त्या किल्ल्याचा इतिहास काय आहे, याचाही अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा. केवळ किल्ले बनविणे हा या स्पर्धेचा उद्देश नसून, त्यामागील छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि इतिहासाचा उलगडा विद्यार्थ्यांना व्हावा, हा मुख्य हेतू आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सिंहगड, लोहगड, मल्हारगड, प्रतापगड, राजगड आणि तोरणा यांसारख्या ऐतिहासिक किल्ल्यांची हुबेहूब निर्मिती केली. किल्ले बनविण्यासाठी विद्यार्थ्यांना विटा आणि माती उपलब्ध करून देण्यात आली होती. लहान व मोठ्या अशा दोन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना दरवर्षी किल्ले बनविण्यासाठी असे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल, असेही गणेश भोसले यांनी सांगितले.

स्पर्धेत वरद देशमुख याने राजगड किल्ल्याची प्रतिकृती साकारली. त्यासोबतच किल्ल्यावरील सध्याची परिस्थिती, कचरा, अस्वच्छता, धूम्रपान, मद्यपान, प्रदूषण आणि फोटोसेशन यांसारख्या बाबींचा उल्लेख करून ऐतिहासिक वास्तूंचा कशा प्रकारे दुरुपयोग केला जातो, हा विषय प्रभावीपणे मांडला.

समर्थ बाबर याने प्रतापगड किल्ला साकारताना भवानी तलवार, दिंडी, चोर दरवाजा, घोडे आणि तलाव यांची मांडणी केली. दक्ष मेहेर याने सिंहगड, श्रेयस करंडे याने लोहगड, अक्षय भोसले याने मल्हारगड, आदेश काळे याने मल्हारगड, अथर्व बारसे याने प्रतापगड, तर ओवी वेळापुरे हिने तोरणा किल्ल्याची प्रतिकृती साकारली.

लहान गटामध्ये वरद देशमुख याने प्रथम, श्रेयस करंडे याने द्वितीय, तर आदेश काळे याने तृतीय क्रमांक पटकावला. ओवी वेळापुरे आणि अथर्व बारसे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

मोठ्या गटामध्ये अक्षय भोसले याने प्रथम, सोहम दिपके याने द्वितीय, तर दक्ष मेहेर याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना सायकल, तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच, तर उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना रोख रक्कम देण्यात आली. यावेळी स्पर्धेची पाहणी करताना गणेश भोसले, अवधूत फुलसौंदर, ठाकूरदास परदेशी, सतीश गुगळे, पंकज मेहेर, रवींद्र सेलोत, भास्कर गायकवाड, रघुनाथ केदार, साबळे सर आदींसह पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विश्वभारती अभियांत्रिकीचे विद्यार्थी 'आविष्कार' स्पर्धेच्या विद्यापीठ स्तरावर



प्रणिता नंदखिले



स्वाती पालवे

नगर – येथील विश्वभारती अकॅडमीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग (ECE) विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'आविष्कार' स्पर्धेच्या विद्यापीठ स्तरासाठी पात्र ठरून अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

तृतीय वर्षात शिकणाऱ्या प्रणिता नंदखिले आणि स्वाती पालवे या विद्यार्थिनींनी 'झोनल लेव्हल आविष्कार स्पर्धेत' सहभाग घेतला होता. या स्पर्धेतून त्यांची विद्यापीठ स्तरासाठी निवड झाली आहे. त्यांनी सीकिंग ॲट-होम लॉन्ग-टर्म ऑटोनॉमी ऑफ असिस्टिव्ह मोबाईल रोबोटस् या नाविन्यपूर्ण पोस्टरचे सादरीकरण केले.

या यशाबद्दल संस्थेच्या संचालिका सौ. व्ही. एस. धोंगडे, आविष्कार समन्वयक बी. एस. हजारे, ईसीई विभागप्रमुख सौ. एस. सी. पुराणिक तसेच विभागाचे आविष्कार समन्वयक एस. बी. निकाळजे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने त्यांचे अभिनंदन केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणाऱ्या विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छाही दिल्या आहेत.

नगरमध्ये १९ नोव्हेंबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

रुबी हॉल क्लिनिक येथील हृदयरोग तज्ज्ञांचे उपचार मार्गदर्शन

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १९ नोव्हेंबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फॉंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. शिबिरासाठी ०२४१-२३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी.

केडगाव येथे २१ व २२ नोव्हेंबर रोजी नरेंद्राचार्य यांचा दर्शन व समस्या मार्गदर्शन सोहळा



नगर – जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम संस्थान (उपपीठ उत्तर महाराष्ट्र,नाशिक) यांच्या वतीने नरेंद्राचार्य यांचा दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा २१ व २२ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. नगर-पुणे रोडवरील केडगाव येथील इंडस्ट्रीज एरिया समोरील निशा लॉन येथे सकाळी ९ वाजता या सोहळ्याचे संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन व सामाजिक उपक्रमांतर्गत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय सोहळ्यात २१ नोव्हेंबर रोजी साधक दीक्षा, तर २२ नोव्हेंबर रोजी उपासक दीक्षा व बाल उपासक दीक्षा सोहळा पार पडणार आहे. यासाठी भाविकांनी नोंदणी करावी.

जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेतून संस्थानमार्फत देशभरात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. २०१६ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वैद्यकीय शिक्षणासाठी २६७ मरणोत्तर देहदान आणि गरजू रुग्णांसाठी २३२ अवयवदान करण्यात आले आहे. जानेवारी २०२६ मध्ये अवघ्या १५ दिवसांत १ लाख ७१ हजार १५० रक्तपिशव्यांचे संकलन झाले. तसेच गेल्या १७ वर्षांपासून राज्यातील १० प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर ५५ मोफत रुग्णवाहिका आणि १ कार्डियाक रुग्णवाहिका २४ तास कार्यरत असून या माध्यमातून ३५,६७० हून अधिक अपघातग्रस्तांचे प्राण वाचले आहेत. पाणी आडवा, पाणी जिरवा मोहिमे अंतर्गत डिसेंबर २०२५ मध्ये ४,५९८ कच्चे बंधारे बांधण्यात आले . जुलै २०२६ मध्ये देशभरात ६ लाख १८ हजार ००९ वृक्षांची विक्रमी लागवड करण्यात आली. मोफत इंग्रजी माध्यमाची शाळा, वेदपाठ शाळा, आपत्कालीन मदत आणि महिलांना मोफत शिलाई यंत्र व घरघंटी वाटप असे उपक्रम सातत्याने सुरू आहेत.

३१ ऑक्टोबर रोजी नाशिक येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज व विविध आखाड्यांच्या महंतांच्या उपस्थितीत सिंहस्थ कुंभमेळा ध्वजारोहण सोहळा झाला.

सती-पार्वती खंडातून श्रद्धा, समर्पण आणि तपश्चर्येचा संदेश

समाधान महाराज शर्मा



सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचा तिसरा दिवस भक्तिमय वातावरणात उत्साहात झाला. (छायाचित्र : लहू दळवी)

शिवमहापुराण कथा सप्ताहाचा तिसरा दिवस भक्तिमय वातावरणात; महिलांची मोठी उपस्थिती

नगर – दिल्ली गेट येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाचा तिसरा दिवस भक्तिमय वातावरणात उत्साहात झाला. यावेळी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून शिवमहापुराणातील सती-पार्वती खंडाचे निरूपण केले. भजनांच्या माध्यमातून भगवान शंकराच्या नामाचा जयघोष करण्यात आला. कथाश्रवणासाठी महिलांसह भाविकांची मोठी उपस्थिती होती. विशेष म्हणजे, एकसारख्या पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान करून आलेल्या महिलांनी धार्मिक कार्यक्रमाची शोभा वाढवली.

समाधान महाराज शर्मा म्हणाले की, सती-पार्वती खंडाचे वाचन आणि श्रवण केल्याने मनामध्ये सकारात्मक श्रद्धा, भक्तिभाव आणि आध्यात्मिक विचारांची वृद्धी होते. सती-पार्वती खंड हा भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या दिव्य चरित्राशी संबंधित अत्यंत महत्त्वपूर्ण धार्मिक खंड आहे. यामध्ये माता सती यांचे समर्पण, त्याग, भक्ती तसेच माता पार्वती यांच्या तपश्चर्येचे वर्णन आढळते. भगवान शंकरांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी माता पार्वती यांनी केलेली कठोर साधना, अढळ श्रद्धा आणि प्रेम यातून भक्तांना भक्तीचा खरा अर्थ समजतो.

सकारात्मक विचार आणि भक्तिभाव

माता सती आणि माता पार्वती यांच्या पवित्र जीवनातील त्याग, भक्ती आणि भगवान शिव यांच्याशी असलेल्या दिव्य नात्याचे वर्णन या खंडात करण्यात आले आहे. श्रद्धा, समर्पण आणि तपश्चर्यानिष्ठेचा अनमोल संदेश या कथेतून मिळतो. माता पार्वती यांची अढळ श्रद्धा आणि कठोर तपश्चर्या प्रत्येक भक्ताला प्रेरणा देणारी आहे. या खंडाचे वाचन व श्रवण केल्याने मनाला शांती, सकारात्मक विचार आणि भक्तिभाव प्राप्त होतो.

जीवनाला आध्यात्मिकतेची जोड द्यावी


आपल्यावर येणारी संकटे कितीही मोठी असली, तरी श्रद्धा आणि विश्वास कायम ठेवला पाहिजे. धार्मिक कथांचे श्रवण केल्याने मनामध्ये ईश्वरभक्ती आणि सद्विचार निर्माण होतात. मानवी जीवनात श्रद्धा, संयम, त्याग आणि निष्ठा या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी मनातील विश्वास आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा कधीही सोडू नये. माता पार्वती यांचे जीवन प्रत्येक भक्ताला भक्ती, शक्ती आणि समर्पणाचा मार्ग दाखवते. संसारात दुःख असतानाही माणूस संसार करीत असतो; मात्र हे दुःख कमी करण्यासाठी जीवनाला आध्यात्मिक कतेची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन समाधान महाराज शर्मा यांनी केले.

पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या शिवमहापुराण कथाश्रवणासाठी महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. विशेष म्हणजे, महिला एकसारख्या पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान करून कथास्थळी येत असून, त्यांच्या उपस्थितीमुळे धार्मिक कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त होत आहे. यावेळी तिरुपती बालाजी देवस्थानचे सौरभ बोरा, मुंबई गोवा बार कॉन्सिलचे ॲड. गणेश शिरसाट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वाल्मीक कुलकर्णी, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, नगरसेवक करण कराळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, प्रा. संजय धोपावकर, उद्योजक अमित गटणे, करण भळगट, राजेंद्र बोगा, सागर गोंधळे,गौरव ताकपीरे,समर्थ ताकपीरे, सर्वेश देशमुख, आदित्य धोपावकर यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

१८ नोव्हेंबर रोजी सामूहिक पुरणपोळी अन्नदान

शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी, १८ नोव्हेंबर रोजी सामूहिक पुरणपोळी अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमात प्रत्येक महिला आपल्या घरून पुरणपोळी घेऊन येणार असून, ट्रस्टच्या वतीने आमटी, भात आणि गुळवणीची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्वांच्या सहभागातून सामूहिक अन्नदानाचा हा धार्मिक उपक्रम संपन्न होणार असल्याची माहिती आयोजक उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी दिली.



अविनाश कराळे यांचा उपाध्यक्षपदी निवडीबद्दल सन्मान करताना अध्यक्ष अमोल खोले आणि पदाधिकारी.

नाट्य परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी अविनाश कराळे



नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या उपाध्यक्षपदी निवेदक, नाट्यसमीक्षक तथा रंगकर्मी अविनाश कराळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा शाखेची बैठक पार पडली. यावेळी सहकार्यवाहपदी नाना मोरे यांची तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे, उद्योजक तथा रंगकर्मी अमित गटणे, निवेदक उद्धव काळापहाड, सी.ए. राजेंद्र ऊर्फ ज्ञानेश्वर काळे, उद्योजक अशोक अकोलकर, रंगकर्मी तेजा पाठक, आर्टिस्ट किरण गवते, चित्रकार प्रशांत सूर्यवंशी आणि अभिजित दरेकर यांच्यासह सदस्यांची निवड करण्यात आली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष अमोल खोले यांनी नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची घोषणा केली. यावेळी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे मुंबई येथील कोषाध्यक्ष सतीश लोटके, प्रमुख कार्यवाह सागर मेहेत्रे, कोषाध्यक्ष अनंत जोशी तसेच कार्यकारिणी सदस्य गणेश लिमकर उपस्थित होते.

बैठकीत संघटनात्मक बळकटी, नाट्यविषयक उपक्रम, नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जिल्ह्यातील नाट्यचळवळीचा विस्तार याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शाखेच्या आगामी कार्याचा आराखडा आणि विविध उपक्रमांच्या नियोजनाबाबत सदस्यांनी आपली मते मांडली.

अहिल्यानगर जिल्हा शाखेचे रौप्यमहोत्सवी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. या निमित्ताने जिल्हाभरात सांस्कृतिक, साहित्यिक आणि नाट्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये ज्येष्ठ रंगकर्मींचा गौरव, नाट्य कार्यशाळा, एकांकिका स्पर्धा, नाट्यसंमेलन तसेच विशेष नाट्यमहोत्सव आयोजित करण्याचे नियोजन आहे.

अविनाश कराळे यांनी मराठी रंगभूमीच्या विकासासाठी, नवोदित कलावंतांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि जिल्ह्यातील नाट्यचळवळ अधिक व्यापक करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. जिल्ह्यातील कलाकार, नाट्यसंस्था आणि रसिकांना एकत्रित घेऊन नाट्य परिषदेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर जिल्हा शाखेची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष : अमोल खोले, उपाध्यक्ष : अविनाश कराळे, प्रा. रवींद्र काळे, कार्याध्यक्ष : सतीश लोटके, प्रमुख कार्यवाह : सागर मेहेत्रे, सहकार्यवाह : रियाज पठाण, नाना मोरे, कोषाध्यक्ष : अनंत जोशी, संघटक : शशिकांत नजन, कार्यकारिणी सदस्य : सदानंद भणगे, सी.ए. राजेंद्र ऊर्फ ज्ञानेश्वर काळे, अमित गटणे, अभिजित दरेकर, किरण गवते, स्वप्नील मुनोत, अशोक अकोलकर, गणेश लिमकर, प्रशांत सूर्यवंशी, तुषार चोरडिया, उद्धव काळापहाड आणि तेजा पाठक.

फ्लॉवरचं भरीत

इटपट रेसिपी

फ्लॉवरची भाजी आपण नेहमीच खातो. चवीत थोडा बदल हवा असेल तर तुम्ही फ्लॉवरचं भरीत करू शकता. झटपट होणारं हे भरीत तुमच्या जेवणाची लज्जत वाढवेल.

साहित्य : एक फ्लॉवर, अर्धा कप मटार, दोन टोमॅटो, एक कांदा, सात लसूण पाकळ्या, आल्याचा तुकडा, चार हिरव्या मिरच्या, लिंबाचा रस एक चमचा, अर्धा चमचा हळद, एक चमचा तिखट, थोडी राई, जीरं, चमचाभर बडिशेप, गरम मसाला, तेल, मीठ आणि कोथिंबिर.

कृती : फ्लॉवरचे बारीक तुकडे करून घ्या. कांदा आणि टोमॅटोही चिरून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घाला. तेल तापल्यावर राई घाला. राई तडतडली की जीरं घाला. मग कांदा घालून परतून घ्या. आलं-लसूण वाटून घ्या. कांदा सोनेरी झाला की त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परता. मिरच्यांचे तुकडे घाला. मग हळद, तिखट, गरम मसाला, बडिशेप घाला. परतून घ्या. यानंतर टोमॅटो घाला. टोमॅटो शिजल्यावर त्यात फ्लॉवर आणि मटार घाला. मध्यम आचेवर शिजवून घ्या. फ्लॉवर आणि मटार शिजल्यावर मॅशरने मॅश करून घ्या. लिंबू पिळा. दोन मिनिटं शिजवा. गॅस बंद करून वरून कोथिंबिर घाला. हे भरीत पोळी किंवा पराठ्यासोबत छान लागेल.



वेदांचे शिक्षण घेऊन 'इस्रो'मध्ये वैज्ञानिक

अचिव्हर

के रळमधील गोविंद कृष्णन एम. यांचा शैक्षणिक प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी शाळा सोडल्यानंतर त्यांनी गुरुकुलात वेदांचे शिक्षण घेतले. त्यानंतर पुन्हा आधुनिक शिक्षणाकडे वळत त्यांनी 'जेईई' परीक्षा उत्तीर्ण केली आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'मध्ये वैज्ञानिक म्हणून स्थान मिळवले.



गोविंद कृष्णन यांनी २०११ मध्ये केंद्रीय विद्यालय, पय्यानूर येथून चौथीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी शालेय शिक्षणाऐवजी त्रिशूर येथील ब्रह्मस्वम मठाच्या गुरुकुलात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी यजुर्वेदाचा अभ्यास केला. मंत्रांचे पठण, त्यांचे उच्चारण आणि पाठांतर यावर त्यांच्या शिक्षणात विशेष भर होता. गुरुकुलातील त्यांचा दिनक्रम शिस्तबद्ध होता. सकाळी पाच वाजता उठून ते वेदांचा नियमित सराव करत असत. पाच वर्षांचा वैदिक अभ्यासक्रम त्यांनी चार वर्षांत पूर्ण केला. या काळात त्यांना भारतीय पारंपरिक ज्ञानपरंपरेचा जवळून अभ्यास करता आला. वेदांचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर गोविंद यांनी मुख्य प्रवाहा-तील शिक्षण सुरू केले. त्यांनी नाडक्कावू येथील विवेकादयम बॉईज हायर सेकंडरी स्कूलमध्ये आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर कर्नाटकातील मूडबिद्री येथील अल्वा कॉलेजमधून बारावी पूर्ण केली. गोविंद यांनी 'जेईई मेन' आणि 'जेईई ॲडव्हान्स्ड' या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केल्या. २०२१ मध्ये त्यांना तिरुवनंतपूरम येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी' (आयआयएसटी) येथे प्रवेश मिळाला. तिथे त्यांनी 'इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग'मध्ये बी. टेक. पूर्ण केले. यानंतर 'इस्रो'च्या भरती प्रक्रियेत यश मिळवून त्यांची तिरुवनंतपूरम येथील 'विक्रम साराभाई स्पेस सेंटर'मध्ये वैज्ञानिक पदासाठी निवड झाली.



छंदातून घडते करिअर

वेगळ्या वाटा

मैदानावर क्रिकेट खेळणारा प्रत्येक मुलगा क्रिकेटपटू होत नाही, तसेच गुणगुणणारा प्रत्येकजण गायक होत नाही; मात्र याच छंदातून अनेकांची यशस्वी कारकीर्द घडते. म्हणून महत्त्वाचा प्रश्न, छंदाला करिअर बनवायचे की विरंगुळा म्हणून जपायचे? प्रत्येक व्यक्तीला कोणता ना कोणता छंद असतो. या छंदाचे व्यावसायिक कौशल्यात रूपांतर करता आले, तर त्यातून उत्तम करिअर घडू शकते. छंदाचे करिअर होण्याचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे आपल्याला आवडणारे काम हेच आपले रोजचे बनते. त्यामुळे काम ओझे न वाटता त्यातून आनंद मिळतो. आपण अधिक उत्साहाने, सातत्याने आणि कल्पकतेने काम करतो. साहजिकच कामाची गुणवत्ता वाढते. त्यातून आर्थिक उत्पन्नासोबत प्रसिद्धी, प्रतिष्ठा, समाधान आणि समाज मान्यताही मिळू शकते.

चित्रकलेची आवड कमर्शिअल आर्ट, फॅशन किंवा प्रॉडक्ट डिझाइनकडे घेऊन जाऊ शकते. स्वयंपाकाची आवड असल्यास हॉटेल मॅनेजमेंट, रेस्टॉरंट, क्लाऊड किचन, केटरिंग किंवा फूड चॅनेल असे अनेक पर्याय उपलब्ध होऊ शकतात. 'सोशल मीडिया' आणि डिजिटल माध्यमांमुळे फोटोग्राफी, लेखन, फिटनेस, प्रवास, हस्तकला अशा अनेक छंदांमधूनही उत्पन्न आणि स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचे नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत; मात्र महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. छंद असणे आणि त्यामध्ये व्यावसायिक गुणवत्ता असणे यात फरक आहे. केवळ एखादी गोष्ट आवडते म्हणून तिचे करिअर करणे योग्य ठरेलच असे नाही. त्या क्षेत्रातील आपले कौशल्य, सातत्य, प्रशिक्षण, स्पर्धा, बाजारपेठ आणि उत्पन्नाच्या संधी यांचाही विचार करावा लागतो, म्हणून छंदाचे थेट पूर्णवेळ करिअर करण्यापूर्वी त्याची छोटी चाचणीही घेता येईल.



उदाहरणार्थ, आपल्या चित्रांची विक्री होते का, आपले गायन इतरांना आवडते का, आपल्या खाद्यपदार्थांची चव लोकांना भावते का, किंवा आपल्या डिजिटल कंटेंटला सातत्याने प्रेक्षक मिळतात का, हे पाहावे. गुणवत्ता, कौशल्य, सातत्य आणि बाजारातील मागणी यांचा योग्य मेळ बसला, तर छंदाचे करिअरमध्ये रूपांतर अधिक वास्तववादी ठरते. छंद अद्याप व्यावसायिक दर्जाचा नसेल तर तो सोडण्याचीही गरज नाही. आपण दुसरे स्थिर करिअर करून संध्याकाळचा वेळ किंवा शनिवार-रविवार आपल्या छंदासाठी देऊ शकतो. एखादा सॉफ्टवेअर इंजिनीअर उत्तम चित्रे काढू शकतो किंवा डॉक्टर गाणे शिकू शकतो. अशा वेळी छंद पैसा देणार नाही; परंतु तो मनाला आनंद, ऊर्जा आणि विरंगुळा नक्कीच देईल. अनेकदा असा छंद मुख्य करिअरमधील ताण कमी करून व्यक्तीला मानसिकदृष्ट्या ताजेतवानेही ठेवतो.

पारंपरिक अन्य करिअर करताना आपला छंद नियमितपणे जोपासला आणि वृद्धिंगत केल्यास कदाचित तो भविष्यात कालांतराने करिअर होऊ शकेल या दर्जाचा होतो. त्या वेळी आपण छंदाचे रूपांतर व्यवसायात करू शकतो. अनिल कुंबळे इंजिनीअर होऊन क्रिकेटमध्ये मोठे करिअर करू शकले. म्हणून छंद जोपासला पाहिजे. छंद करिअर बनला तर यश देतो; विरंगुळा राहिला तर आनंद देतो!

वयात अंतर आहे...

मैत्र मेकिंग

मी २७ वर्षांची तरुणी असून, एका कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण तो माझ्याहून पाच वर्षांनी लहान आहे. आम्ही शेजारी असून लहानपणापासून एकमेकांना ओळखतो. आमचे कुटुंबिय हे नातं स्वीकारण्याची शक्यता तशी कमी असली तरी या नात्याचा गांभीर्याने विचार करावा असं मला वाटतं. या मुलाचंही माझ्यावर प्रेम असावं. हा मुलगा २२ वर्षांचा असून त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. त्याला मास्टर्स करायचं आहे. मला हा मुलगा आवडतो. अशा परिस्थितीत मी काय करू?




उत्तर : वयात अंतर असूनही आनंदाने संसार करणारी बरीच जोडपी पहायला मिळतात. अशा नात्यांमध्ये दोघांनीही एकमेकांना समजून घ्यायला हवं. दुसरं म्हणजे तुला या मुलाबद्दल फक्त आकर्षण वाटतं का हे खरंच प्रेम आहे, हे आधी ठरवून घे. या मुलाचंही तुझ्यावर प्रेम असल्याचं तू गृहित धरलं आहेस. त्याला तुझ्याबद्दल नेमकं काय वाटतं हे आधी जाणून घे. याबाबत त्याच्याशी बोल. त्यालाही तुझ्याबद्दल प्रेम वाटत असेल तर पुढे जाता येईल. तू आयुष्यात यशस्वी आहेस. पण या मुलाचं शिक्षण सुरू आहे. त्यामुळे त्यालाही करिअर घडवायचं असेल. म्हणूनच त्याच्या मनातलं जाणून घे. गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घे.

तलावावर तरंगणारे उद्यान

भटकंती


आपण राष्ट्रीय उद्यानांचा विचार करतो तेव्हा आपल्या डोळ्यांसमोर अनेकदा घनदाट जंगलं, मोकळी गवताळ मैदानं किंवा उंच पर्वत येतात; पण भारतात एक असं संरक्षित क्षेत्र आहे, जे ही धारणा पूर्णपणे बदलून टाकते. येथील संपूर्ण दृश्य खाली असलेल्या पाण्यासोबत सतत बदलत असते. खरं तर या उद्यानातील वन्यजीव तरंगणाऱ्या वनस्पतींमध्ये संचार करतात आणि संपूर्ण परिसंस्था एखाद्या विशाल गोड्या पाण्याच्या सरोवरावर तरंगत असल्यासारखी दिसते. हे अविश्वसनीय वाटेल; पण हे अद्वितीय ठिकाण देशातील सर्वांत मनोरंजक वन्यजीव अधिवासांपैकी एक बनले आहे.



मणिपूर पर्यटन विभागाच्या मते, मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यातील लोकतक सरोवरावर वसलेले 'केबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यान' हे जगातील एकमेव तरंगणारे राष्ट्रीय उद्यान आहे. हे इम्फाळपासून अंदाजे ५० ते ५५ किलोमीटर अंतरावर आहे. या उद्यानाचे सर्वांत खास वैशिष्ट्य म्हणजे, त्याची 'फुमडीस' (तरंगणाऱ्या फांद्या) यांची आधार प्रणाली. स्थानिक भाषेत 'फुमडीस' म्हणून ओळखले जाणारे हे ढिगारे म्हणजे लोकटक सरोवरात आढळणारे तरंगणाऱ्या वनस्पतींचे मोठे ढिगारे आहेत. या तरंगणाऱ्या परिसंस्था साचलेल्या वनस्पती, माती आणि सेंद्रिय पदार्थांनी बनलेल्या आहेत.

हा अनोखा भूप्रदेश संगाई हरणांसाठी एक महत्त्वाचा अधिवास आहे. या हरणांना तपकिरी शिंगांचे हरिण म्हणूनही ओळखले जाते. ही हरणे मणिपूरच्या या भागात नैसर्गिकरीत्या आढळतात. या उद्यानात इतर वन्यजीव, तसेच विविध प्रकारचे पाणपक्षी आणि स्थलांतरित पक्षीही आढळतात. एक प्रवासी म्हणून तुम्हाला नोव्हेंबर ते मार्च यादरम्यान हॉग डीअर, पाणमांजर, पाणपक्षी आणि अनेक स्थलांतरित पक्षीदेखील येथे दिसू शकतात.


लोकतक सरोवर हे ईशान्य भारतातील सर्वांत मोठे गोड्या पाण्याचे सरोवर आहे आणि त्यातील तरंगत्या 'फुमडी' हे त्याचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण अंग आहे. काही लोक तर या तरंगत्या रचनांवरच राहतात, जिथे 'फुमसंम्स' नावाच्या पारंपरिक तरंगत्या झोपड्या सरोवराच्या दृश्याचा एक भाग बनल्या आहेत. हे दृश्य खरोखरच खूप सुंदर दिसते. प्रवासी सेंद्रा येथून तलावाच्या दृश्यांचा आनंद घेऊ शकतात. तसेच लोकतकच्या जवळपास नौकाविहार आणि जलक्रीडांचा आनंद घेऊ शकतात. पर्यटन विभागाच्या शिफारस केलेल्या प्रवास कार्यक्रमांमध्ये केबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यानापर्यंतच्या सकाळच्या कॅनो राइड्सचा समावेश आहे.



शाश्वत वस्त्रोद्योगासाठी नव्या संधी

उद्योगजगत

भारतातील ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक रंगीत सुती कपड्यांविषयी आकर्षण वाढत आहे. एका संशोधनानुसार, सुमारे २८ टक्के ग्राहक अशा कपड्यांसाठी अधिक पैसे मोजण्यास तयार आहेत. पुण्यातील 'सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल बिझनेस'च्या संशोधकांनी नैसर्गिक रंगीत सुती कपड्यांविषयी ग्राहकांच्या आवडी-निवडीसंदर्भातील आकडेवारीचे विश्लेषण केले. त्यातून नैसर्गिक रंग असलेला कापूस ग्राहकांच्या मोठ्या वर्गाला आकर्षित करत असल्याचे दिसले. अशा कपड्यांची निवड ग्राहकांच्या पर्यावरणविषयक दृष्टिकोनाशी अधिक सुसंगत असल्याचे समोर आले आहे.



पर्यावरणपूरक उत्पादनांच्या बाबतीत केवळ पर्यावरणाचा विचार पुरेसा नसतो, तर कपड्यांनी मिळणारा आराम, टिकाऊपणा आणि किंमत हे घटकही महत्त्वाचे ठरतात. कापूस उत्पादनाला भारतात ऐतिहासिक परंपरा आहे. नैसर्गिकरीत्या रंगीत कापसाला आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग बाजारपेठेत, विशेषतः युरोपमध्ये लोकप्रियता मिळू लागली आहे. पर्यावरणपूरक उत्पादनांविषयी वाढती जागरूकता आणि शाश्वत फॅशनकडे वाढणारा कल यांमुळे या क्षेत्राला नव्या संधी उपलब्ध होत आहेत; मात्र भारतात पर्यावरणपूरक कापसाचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यापारविषयक पायाभूत सुविधांचा अभाव ही एक मोठी अडचण आहे. पुरवठा साखळी सक्षम करणे आणि बाजारपेठेपर्यंत उत्पादन पोहोचवण्याची व्यवस्था सुधारणे आवश्यक असल्याचे संशोधनातून सूचित होते.

पर्यावरणपूरक उत्पादनांविषयी ग्राहकांच्या पसंतीत होत असलेल्या सकारात्मक बदलांना प्रोत्साहन देण्यासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत धोरण आखण्याची गरज आहे. नैसर्गिक रंगीत कापसापासून तयार होणाऱ्या वस्त्रांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण केले, तर वस्त्रोद्योगात नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात. पर्यावरणपूरक उत्पादनांची निर्मिती, त्यांचा पुरवठा आणि विपणन यांना चालना दिल्यास भारताच्या पारंपरिक कापूस उद्योगाला जागतिक बाजारपेठेत अधिक संधी मिळू शकतात.

पैसा टिकत नाही? मग 'हे' करा!

गुंतवणूक

अलीकडच्या काळात गुंतवणुकीचे विविध मार्ग आले आहेत. कमी काळात अधिक परतावा देणाऱ्या योजना सुरू झाल्या आहेत; मात्र अनेकांना पैशांची गुंतवणूक करणं जमत नाही. कोणत्या ना कोणत्या कारणाने पैसा खर्च केला जातो. पैसा येतो मात्र टिकत नाही. मग अशा वेळेस तुम्ही नेमकं काय कराल? तर तुम्ही पाच सोप्या गोष्टींचा अवलंब करा, तुम्हाला कधीच पैशांची अडचण येणार नाही.



सर्वप्रथम तुम्हाला दरम हा किती पैसे येतात आणि ते कुठे जातात, हे पाहावे लागेल. एक छोटा चार्ट बनवा. त्यात तुमचे उत्पन्न आणि खर्च दोन्ही लिहिलेले असतील. या चार्टवरून फालतू खर्च कुठे होत आहे, हे तुम्हाला स्वतःच दिसेल. फालतू खर्च कमी करा आणि बचत वाढवा.

तुमचे पैसे कोणत्याही नियोजनाशिवाय बँकेत किंवा मुदत ठेवीत पडले असतील, तर ते पैसे फक्त झोपेत आहेत. सर्वप्रथम तुम्ही कमीत कमी सहा महिन्यांच्या खर्चाइतका 'आपत्कालीन निधी' तयार केला पाहिजे. हे पैसे तुमचे सुरक्षाकवच आहेत. तुमची नोकरी गेली किंवा तुम्हाला वैद्यकीय गरज भासली तर हे तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.

आधी स्वतःचे आणि तुमच्या कुटुंबाचे रक्षण करा. म्हणून मुदत विमा आणि आरोग्य विमा घेणे महत्त्वाचे आहे. तुमच्या वार्षिक उत्पन्नाच्या पंधरा ते वीसपट जास्त असलेला 'टर्म इन्शुरन्स' आणि महागाई लक्षात घेऊन आरोग्य विमा घ्या. आता सुरक्षितता असल्याने पैसे वाढवण्याची म्हणजेच 'एसआयपी' (सिस्टीमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) आणि म्युच्युअल फंडांद्वारे गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे. कार खरेदी करणे, घर खरेदी करणे, मुलांचे शिक्षण, निवृत्ती अशा तुमच्या प्रत्येक ध्येयासाठी वेगळा 'एसआयपी' असावा. एकदा योजना आखली की, काम संपले, असे नाही. दर सहा महिन्यांनी किंवा वर्षाने तुमच्या आर्थिक योजनेचा आढावा घ्या. उत्पन्न वाढले आहे का, काही नवीन खर्च जोडला आहे का, तुम्हाला काही नवीन स्वप्ने पडली आहेत का, यानुसार तुमचा प्लॅन अपडेट करा.

आर्थिक नियोजन करणे कठीण नाही. त्यासाठी फक्त थोडी सवय आणि शिस्त लागते. तुम्ही या पायऱ्या फॉलो केल्या तर तुमचे पैसे तुमच्यासाठी खूप काम करतील आणि तुम्ही आयुष्यभर पैशाच्या मागे धावणार नाही.

शेर की जुबानी

चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी में गिरा आँसू पहचान लेती है।

अब तो वो चाकू लेके मेरे पिछे पडा है, उसे कहा था दिल चीर के देख,तेरा ही नाम होगा

होके मायूस ना यूं शाम से ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज सा निकलते रहिये।

टेक्नो टॉक


इंटरनेटचा स्पीड पाचपट होणार

भारतात अजूनही 'फाइव्ह जी' नेटवर्कचा विस्तार हळूहळू होतोय. त्यातच आता 'जिओ'ने 'सिक्स जी'ची तयारीदेखील सुरू केली आहे. पुढील पिढीच्या वाढत्या तंत्रज्ञानाचा विचार करता, 'जिओ'ने 'सिक्स जी' क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. या नव्या तंत्रज्ञानाची झलकही दाखवण्यात आली आहे. या नव्या 'सिक्स जी'च्या तंत्रज्ञानात इंटरनेटचा स्पीड पाचपट जास्त करणे, तसेच एमएसजी किंवा इतर वापरासाठी लागणारा वेळ दहापट कमी करण्याचे 'जिओ'चे ध्येय आहे.

'जिओ'च्या मते, 'सिक्स जी' नेटवर्कमध्ये सध्याच्या 'फाइव्ह जी'च्या तुलनेत पाचपट जास्त नेटवर्क क्षमता मिळवण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर लेटन्सी जवळपास दहापट कमी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. लेटन्सी म्हणजे एखादी विनंती पाठवल्यानंतर नेटवर्ककडून प्रतिसाद मिळेपर्यंत लागणार वेळ. हा वेळ कमी झाल्यास 'रिअल टाइम एआय' सेवा, दूरस्थ आरोग्यसेवा, डिजिटल शिक्षण आणि होलोग्राफिक संवाद यांसारख्या तंत्रज्ञानाला फायदा होऊ शकतो.

'जिओ'च्या मते, 'सिक्स जी' तंत्रज्ञानाचे जागतिक मानक २०३० पर्यंत निश्चित होण्याची शक्यता आहे. भारतातही सुरुवातीच्या टप्प्यात 'सिक्स जी' सेवा सुरू करणाऱ्या देशांमध्ये सहभागी होण्याची तयारी केली जात आहे. मात्र, 'जिओ'ने व्यावसायिक सेवा सुरू करण्याची तारीख अद्यापि जाहीर केलेली नाही. 'जिओ'ने दिलेल्या माहितीनुसार, कंपनीने आपल्या तंत्रज्ञानाशी संबंधित आठ हजारांहून अधिक पेटंट दाखल केले आहेत. त्यापैकी शेकडो पेटंट 'सिक्स जी' तंत्रज्ञानाशी संबंधित आहेत. कंपनी 'एआय' आधारित नेटवर्क आणि 'क्लाँटम कॉम्प्युटिंग'मुळे निर्माण होणाऱ्या सायबर सुरक्षा यांच्यावरही काम करत आहे.

टेक्नो टिप्स



वापरा या सोप्या टिप्स

अनेकदा आपण खूप महत्त्वाच्या कामात असताना किंवा एखाद्यासोबत गंभीर विषयावर फोनवर बोलत असताना अचानक समोरच्या व्यक्तीचा आवाज येणे पूर्णपणे बंद होते. अशा वेळी नेमकी अडचण आपल्या फोनमध्ये आहे, की समोरच्याच्या नेटवर्कमध्ये, हे समजायलाच मार्ग उरत नाही. अनेकदा आपण विनाकारण फोन 'रिस्टार्ट' करू लागतो किंवा तांत्रिक बिघाड समजून थेट मोबाईल रिपेअरिंगच्या दुकानात धाव घेतो. मात्र, यासाठी तुमचे पैसे खर्च करण्याची अजिबात गरज नाही. अगदी काही सोप्या टिप्स फॉलो करून तुम्ही घरच्या घरी ही समस्या दूर करू शकता.

इयरपीस आणि स्पीकरची स्वच्छता करा

कॉलवर आवाज न येण्याचे सर्वांत मोठे आणि कॉमन कारण म्हणजे फोनच्या इयरपीसमध्ये साचलेली धूळ आणि मळ. खिशात सतत राहिल्यामुळे किंवा दीर्घकाळ वापरामुळे इयरपीसच्या जाळीमध्ये बारीक कचरा अडकतो. त्यामुळे आवाजाचे तरंग बाहेर येऊ शकत नाहीत. एखादा मऊ ब्रश किंवा जुना टूथब्रश घेऊन हलक्या हाताने इयरपीस साफ करा. यामध्ये कोणतीही टोकदार वस्तू किंवा पिन अजिबात घालू नका; अन्यथा आतील नाजूक भाग खराब होऊ शकतो. साफ केल्यानंतर पुन्हा कॉल करून तपासा. बहुतांशी वेळा हा सोपा उपाय चोख काम करतो.

'नेटवर्क सेटिंग' आणि 'ब्लूटूथ कनेक्शन चेक' करा

कॉलवर आवाज न येण्याचे आणखी एक कारण म्हणजे फोनचे ब्लूटूथ कोणत्याही इतर उपकरणाशी (उदा. वायरलेस इयरफोन किंवा ब्लूटूथ स्पीकर) कनेक्ट असणे. अनेकदा आपले ब्लूटूथ ऑन राहिल्यामुळे कॉलचा आवाज त्या डिव्हाइसकडे डायव्हर्ट होतो. सर्वांत आधी फोनचे ब्लूटूथ आणि वाय-फाय बंद करून पाहा. याशिवाय, फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन नेटवर्क सेटिंग्ज रीसेट करा किंवा काही सेकंदांसाठी एअरोप्लेन मोड ऑन करून ऑफ करा. यामुळे फोनचे नेटवर्क टॉवर रिफ्रेश होतात आणि आवाज कट होण्याचा प्रॉब्लेम सुटतो.

सॉफ्टवेअर ग्लिच आणि व्हॉल्यूम सेटिंग्ज तपासा


दोन्ही उपायांनी फरक पडला नाही, तर तो एखाद्या सॉफ्टवेअर ग्लिचचे किंवा चुकीच्या व्हॉल्यूम सेटिंगचे परिणाम असू शकतो. कॉलिंग दरम्यान नकळत 'म्यूट' बटन दाबले जाण्याची किंवा कॉल व्हॉल्यूम अगदी कमी होण्याची शक्यता असते. कॉल सुरू असताना व्हॉल्यूम अप बटन दाबून आवाज वाढवून पाहा. तरीही फरक पडला नाही, तर एकदा फोन 'रिस्टार्ट' करून घ्या किंवा फोनमध्ये कोणते सॉफ्टवेअर अपडेट पेंडिंग आहे का, हे तपासा. सिस्टीम अपडेट न केल्यामुळेही अनेकदा अशा तांत्रिक अडचणी निर्माण होतात.

फॅशन लग्नसराईतली...

फॅशन पॅशन

लग्नसमारंभासाठीच्या या स्टायलिंग टिप्स...

* थोडं हटके आणि स्टायलिश दिसायचं असेल तर कुर्त्यावर लेअरिंग करता येईल. छान नक्षीकाम केलेला क्रीम कुर्ता घ्या. त्यावर लांब बंदगळा कॅरी करा. चुडीदार कुर्ता आणि बंदगळा यात तुम्ही भाव खाऊन जाल.
* साधेपणातही स्टाईल जपता येते. थोडं नक्षीकाम असणारा बेज रंगाचा कुर्ता आणि जोधपुरी पँट कॅरी करा. त्यावर कोल्हापुरी चप्पल घाला. यात तुम्ही नक्कीच उठून दिसाल. हा पेहराव कोणत्याही ऑकेजनची शान ठरेल.
* प्रिंटेड कुर्ता कोणत्याही कार्यक्रमात शोभून दिसतो. त्यामुळे छानसा प्रिंटेड कुर्ता विकत घ्या. साखरपुडा असो किंवा रिसेप्शन, या प्रसंगी तुम्ही प्रिंटेड कुर्ता घालू शकता. प्रिंटेड कुर्त्यावर बेज रंगाची पँट घालता येईल.
* लग्न सोहळ्यात शेरवानीला बरीच मागणी असते. बरीच मुलं शेरवानी घालून मिरवतात.



दिवाळीचा आनंद हिरावला; पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे कधी?

५ हजारांची मदत तातडीने द्या! अग्रिम मदतीचे रखडलेले वितरण तातडीने पूर्ण करा : सह्याद्री छावा संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी आणि आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, अद्यापही अनेक पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत ही मदत जमा झालेली नसल्याने शासनाच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून वंचित शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.



अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठीजिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना देण्यात आले.

यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर बाळू, राष्ट्रीय प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, भटके-विमुक्त छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, शेतकरी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष विनोद साळवे, जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, श्रीधर शेलार, दत्ता वामन, किसन शिरूरकर, अजय राठोड, भाऊसाहेब फुलमाळी, उत्तम आव्हाड, भानुदास काकडे, सुरेश काकडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम आर्थिक मदत देण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच दिलासादायक आहे. नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना सणासुदीच्या काळात आर्थिक आधार मिळावा, हा या निर्णयामागील उद्देश आहे. मात्र, शासनाने मदत जाहीर करूनही राज्यातील अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांत अद्याप रक्कम जमा झालेली नाही. दिवाळीपूर्वी आर्थिक मदत मिळेल, या अपेक्षेने शेतकरी कुटुंबे प्रतीक्षा करीत होती. परंतु, मदत वेळेत न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांची दिवाळी आर्थिक विवंचनेतच गेली. यंदा दुष्काळी परिस्थिती, अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित पीक आले नाही. उत्पादन खर्चही वसूल न झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

शासनाने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची अग्रिम मदत ही केवळ आर्थिक रक्कम नसून संकटाच्या काळात शेतकऱ्यांसाठी आशेचा आधार आहे. त्यामुळे प्रशासकीय विलंब, तांत्रिक अडचणी अथवा अन्य कारणांमुळे कोणताही पात्र शेतकरी या मदतीपासून वंचित राहणे योग्य नाही. शासनाच्या निर्णयाचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

यासाठी अद्याप मदत न मिळालेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांची तातडीने यादी तयार करून त्यांची पडताळणी करावी. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यांत अद्याप आर्थिक मदत जमा झालेली नाही, त्यांच्या खात्यांत उर्वरित रक्कम विनाविलंब जमा करावी. आधार लिंक, ई-केवायसी, बँक खाते किंवा अन्य तांत्रिक त्रुटींमुळे मदत रखडली असल्यास त्या दूर करण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, मदतीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी तालुकास्तरावर विशेष मदत व तक्रार निवारण कक्ष सुरू करावेत. कोणताही पात्र शेतकरी शासनाच्या या आर्थिक मदतीपासून वंचित राहणार नाही, याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे. शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, आज त्याला केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष आर्थिक मदतीची गरज आहे. शासनाने घेतलेल्या चांगल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यात मदतीची रक्कम पोहोचवावी. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळाल्याशिवाय या निर्णयाचा खरा उद्देश साध्य होणार नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेने केली आहे.

गुरुवाणी - ११४

प्रोटोकॉलचे महत्व...

कोणाला समजून सांगण्यासाठी श्रुत ज्ञान खूप आवश्यक असते. आपल्या जीवनात एक समस्या आहे की, आपल्याला जीवनातील समस्या कळतात, सोल्यूशन कळते पण ते समोरच्या पर्यंत कसे पोहचवले पाहिजे हे कळत नाही. केशी श्रमण ही बाब जाणवतात. त्यांना कळते की, राजा प्रदेशीला आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व समजले आहे पण तो ते मान्य करत नाहीय. केशी श्रमण एक गोष्ट सांगितात, चार मित्र पैसे कमावण्यासाठी निघतात. त्यांना रस्त्यात लोखंडाची खाण दिसते, ते लोखंड जमा करून ते विकण्यासाठी निघतात. पुढे त्यांना चांदीची खाण दिसते, नंतर सोन्याची खाण दिसते, पुढे हिऱ्याची खाण दिसते. चार पैकी तिघे दरवेळी आधी घेतलेले लोखंड, चांदी, सोनं सगळे सोडून हिरे घेतात. एक जण मात्र लोखंडच बाळगून राहतो. मी लोखंडासाठी मेहनत घेतली आहे तर मी ते सोडून दुसरे काही घेणार देणार नाही. पुढे ज्यांच्याकडे हिरे असतात ते श्रीमंत होतात. ज्याने लोखंडच बाळगले तो गरीबच राहिला. म्हणून केशी श्रमण म्हणतात, समोर 'बेस्ट' आले तर 'गुड' असेल ते सोडलेच पाहिजे. प्रत्येक नवीन गोष्ट खराब नसते आणि प्रत्येक जुनी गोष्ट चांगली असते हे सगळ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जर नवीन काही चांगले मिळाले तर त्याचा स्वीकार करा. राजा प्रदेशीला ही बाब लक्षात आली आणि तो केवली धर्म ऐकण्याची तयारी दर्शवतो. यानंतर केशी श्रमणला धर्म सांगितला. तो श्रावक धर्म स्विकारतो पण वंदना न करताच निघतो. त्यावर त्याला केशी श्रमण शिष्टाचार सांगतात. कारण जिथे शिष्टाचार नसतो तिथे दुष्टाचार असतो. प्रत्येक गुरूसाठी वेगवेगळे शिष्टाचार असतात. राजा प्रदेशीला हे माहीत असूनही तो शिष्टाचार पाळत नाही. तो म्हणतो, मी सगळ्यांसमोर अपराध केले आहेत, म्हणून मी त्याची क्षमा सगळ्यांसमोरच मागेल. त्यांच्या समोरच मी तुम्हाला वंदना करेल. आता नगरमधील अर्हम् विज्ञा परिवार याविषयी बोलतो. या चातुर्मासासाठी अर्हम् विज्ञाच्या काही ट्रेनरनी पहिल्या दिवसापासून खूप परिश्रम घेतले आहेत. चिचोंडीत मी अर्हम् विज्ञा ट्रेनर परिवाराला प्रोटोकॉल दिला होता, चातुर्मासाच्या ठिकाणी आमच्यासाठी आहार टिफिन घेऊन यायचे नाही. त्यांनी हा प्रोटोकॉल पूर्ण पाळला. यासाठी मी त्यांच्याप्रती कृतज्ञ आहे. गुरूदेवांच्या भूमीला संरक्षित ठेवायचे तर सगळ्यांनी प्रोटोकॉल पाळलाच पाहिजे. अर्हम् विज्ञा ट्रेनरना धन्यवाद!

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूलच्या कमांडंटपदी ब्रिगेडियर अंकुश ठाकूर

नगर – मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूल, अहिल्यानगरच्या कमांडंटपदी ब्रिगेडियर अंकुश ठाकूर यांनी औपचारिक पदभार हस्तांतरण सोहळ्यानंतर कार्यभार स्वीकारला. त्यांनी ब्रिगेडियर पथियरी सुनील कुमार, सेना मेडल यांच्याकडून कमांडंट पदाची जबाबदारी स्वीकारली. या पदभार हस्तांतरणामुळे मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूलच्या नेतृत्वाची धुरा आता ब्रिगेडियर अंकुश ठाकूर यांच्या हाती आली आहे. भारतीय लष्करातील शिस्त, समर्पण, व्यावसायिकता आणि उत्कृष्ट कार्यपरंपरेचा वारसा जपणाऱ्या या प्रतिष्ठित संस्थेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारणे ही त्यांच्या लष्करी कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण बाब मानली जात आहे.

मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूलला भारतीय लष्कराच्या इतिहासात विशेष स्थान आहे. या संस्थेने अनेक वर्षांपासून उत्कृष्ट प्रशिक्षण, आधुनिक लष्करी कौशल्ये आणि सक्षम नेतृत्वाच्या माध्यमातून भारतीय लष्करासाठी कुशल मनुष्यबळ घडविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संस्थेचा गौरवशाली इतिहास, समृद्ध परंपरा आणि अभिमानास्पद वारसा जपत भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची जबाबदारी नव्या नेतृत्वावर असेल.



मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर ॲण्ड स्कूल, अहिल्यानगरच्या कमांडंटपदी ब्रिगेडियर अंकुश ठाकूर यांनी कार्यभार स्वीकारला.

ब्रिगेडियर अंकुश ठाकूर यांच्या नियुक्तीमुळे संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळण्यासोबतच प्रशिक्षण, कार्यक्षमता आणि संस्थात्मक उत्कृष्टतेच्या परंपरेला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, संस्थेच्या कमांडंटपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळणारे ब्रिगेडियर पथियरी सुनील कुमार, सेना मेडल यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील लष्करी वाटचालीसाठी आणि भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या नियुक्तीबद्दल ब्रिगेडियर अंकुश ठाकूर यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल नवनवीन यशाची शिखरे गाठेल आणि संस्थेचा गौरवशाली वारसा अधिक समृद्ध करेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अशोक चंगेडे तर नितीन शिंगवी व्हा. चेअरमन

नगर – भिंगार मधील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे यांची फेरनिवड करण्यात आली तर व्हा.चेअरमनपदासाठी तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर तर्फे अध्याशी अधिकारी म्हणून ए. ए. शेख, श्रेणी २ यांचे अध्यक्षतेखाली महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, संचालक नितीन शिंगवी व मारुती कुंडलिकराव पवार यांनी व्हा. चेअरमन पदासाठी भरलेले अर्जानुसार दोघांत गुप्त मतदान होऊन नितीन शिंगवी हे बहुमताने विजयी झाले. असे निवडणूक अधिकारी ए. ए. शेख व सहाय्यक निवडणूक अधिकारी श्री. बनसोडे यांनी जाहीर केले.





तद्नंतर सभेमध्ये असलेले संचालक शांतीलाल मुनोत, संजयकुमार सपकाळ, प्रकाश चोरडिया, कांतीलाल बोरा, विनोद भंडारी, पवन गुंदेचा, संजय (सनी) मुनोत, सुदाम गांधले, किरण पतके, सौ. वैशाली बोरा, सौ. अंजली शिंगवी व संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व अधिकारी व कर्मचारी यांनी चेअरमन डॉ. अशोक चंगेडे व व्हा.चेअरमन नितीन शिंगवी यांचा व निवडणूक अधिकारी ए. ए. शेख व श्री. बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

चांदबिबी महालजवळ युवकावर लोखंडी हातोड्याने जीवघेणा हल्ला

मैत्रिणीची चांदीची अंगठीही लांबवली, दोघा लुटारुंच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर शहराजवळील चांदबिबी महालाजवळ बारदरी (ता.नगर) जाणाऱ्या रस्त्यावर दोघा अनोळखी लुटारूंनी तरुणावर लोखंडी हातोड्याने जीवघेणा हल्ला करत त्या तरुणाच्या मैत्रिणीच्या हातातील चांदीची अंगठी बळजबरीने हिसकावून नेल्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

आलमगीर, भिंगार येथील २३ वर्षीय फिर्यादी तरुण आणि त्यांची मैत्रीण चांदबिबी महालाजवळील बारदरी गावाकडे जाणाऱ्या मार्गावरून जात असताना हा प्रकार घडला.दोन अज्ञात आरोपींनी फिर्यादी आणि त्याच्या मैत्रिणीला रस्त्यात अडवले. सायंकाळची वेळ असल्याने रस्ता निर्मनुष्य होता. याचाच फायदा घेत लुटारूंनी फिर्यादीच्या मैत्रिणीच्या हातातील पंधराशे रुपये किमतीची गोल आकाराची चांदीची अंगठी बळजबरीने हिसकावून घेतली.

यावेळी फिर्यादी तरुणाने अंगठी हिसकावण्याचा विरोध केला असता संतापलेल्या दोन्ही आरोपींनी फिर्यादी तरुणाच्या पाठीत व उजव्या डोळ्याखाली लोखंडी हातोड्याने जोरदार प्रहार केले. या प्राणघातक हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाल्यामुळे त्यांना तातडीने उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

जखमी युवकावर रुग्णालयात उपचार झाल्यानंतर त्यांनी १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी तात्काळ दोघा अनोळखी आरोपींच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०९ (६) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याची गंभीर दखल घेत नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो.नि. गणेश वारुळे यांनी तात्काळ पोलीस पथकाला घटनास्थळी पाठवून पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या तसेच या आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्याही सूचना दिल्या. त्यानुसार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे करत आहेत.

महापालिका प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर फुले दाम्पत्यांच्या स्मारकासाठीचे उपोषण स्थगित

दीड महिन्याचा अल्टिमेटम अन्यथा पुन्हा आंदोलन करण्याचा माळी समाजाचा इशारा

नगर– माळीवाडा वेस येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी भूमिपूजन होऊन तब्बल एक वर्ष तीन महिने उलटले, तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. महापालिका प्रशासनाच्या या दिरंगाईविरोधात अखेर फुलेप्रेमी आणि माळी समाजातील विविध संघटना आक्रमक झाल्या. पुतळे उभारणीच्या कामाला तातडीने सुरुवात करावी आणि माळीवाडा वेस परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवावीत, या प्रमुख मागण्यांसाठी १६ नोव्हेंबर रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती आणि अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने माळीवाडा वेशीवरील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले. दरम्यान, महापालिकेचे उपायुक्त हरीनारायण येलगट्टे आणि अतिक्रमण विभागाचे प्रमुख सुरेश इथापे यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र, दीड महिन्याच्या आत स्मारक उभारणीबाबत ठोस कार्यवाही सुरू न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.



माळीवाडा वेस येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी करण्यासाठी सुरु करण्यात आलेले उपोषण प्रशासानाच्या आश्वासानानंतर मागे घेण्यात आले.

उपायुक्त हरीनारायण येलगट्टे आणि अतिक्रमण विभागाचे प्रमुख सुरेश इथापे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. फुले दाम्पत्यांच्या स्मारक उभारणीसाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यात येईल. तसेच स्मारकाच्या जागेतील अतिक्रमणांचे स्थलांतर करून ते निष्कासित करण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. प्रशासनाकडून मिळालेल्या या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांना ज्यूस पाजून उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष कार्यवाही झाली नाही, तर यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही कृती समिती आणि सकल माळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित

यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले, कृती समितीचे सचिव अशोक कानडे, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, बजरंग भुतारे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, अमोल गाडे, नगरसेवक दत्ता गाडळकर, सुरेश बनसोडे, गोरख पडोळे, नगरसेविका आशाताई डागवाले, नगरसेविका सुनिताताई फुलसौंदर, सुजाता पडोळे, सकल माळी समाजाचे सचिव अमोल भांबरकर, अनिल इवळे, दिपक खेडकर, मळू गाडळकर, राहुल रासकर, कोअर कमिटी सदस्य राजेंद्र ताठे, विष्णुपंत म्हस्के, प्रकाश इवळे, संतोष हजारे, मच्छिंद्र बनकर, मनोज भुजबळ, रोहित पठारे, रमेश चिपाडे, विनायक कोके, सुरेश खरपुडे, रेणुका पुंड, संजय कानडे, अनिल निकम, राहुल रासकर, भानुदास बनकर, रोहिणी बनकर आदी उपस्थित होते.

कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी

यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते म्हणाले की, संपूर्ण समाजाने मोठ्या संयमाने हे आंदोलन स्थगित केले आहे. महापालिका प्रशासनाने पुतळे उभारणीचे काम प्रत्यक्ष सुरू होण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. श्री विशाल गणपती मंदिरासमोर यापूर्वी दिलेल्या शब्दाची प्रशासनाने पूर्तता करावी. पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे. मात्र, समाजबांधवांच्या भावना तीव्र असून आश्वासनाची पूर्तता झाली नाही, तर आंदोलन अधिक आक्रमक होईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या सर्व सामाजिक संघटना आणि समाजबांधवांचे त्यांनी आभार मानले.

फुलेप्रेमी आणि समाजबांधवांमध्ये नाराजी

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजातील सर्व घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. स्त्री शिक्षण, सामाजिक समता, जातिभेद निर्मूलन आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी या महान दाम्पत्याने केलेले कार्य देशाच्या सामाजिक इतिहासात अजरामर आहे. अशा महान समाजसुधारकांचे भव्य स्मारक अहिल्यानगर शहरात उभारण्यात यावे, ही मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र, भूमिपूजन होऊनही स्मारकाचे काम रखडल्याने फुलेप्रेमी आणि समाजबांधवांमध्ये नाराजी व्यक्त करत फुले दाम्पत्यांचे स्मारक उभारणे ही केवळ एका समाजाची मागणी नसून शिक्षण, समता आणि सामाजिक परिवर्तनाचा विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अतिक्रमणे हटवावीत आणि स्मारक उभारणीच्या कामाला तातडीने गती द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

विविध संघटनांनी दिला उपोषणास पाठिंबा

माळीवाडा वेशीवर सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणाला शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि समाजसेवी संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला. यामध्ये ओबीसी व्हिजेएनटी, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, वीरशैव लिंगायत गवळी समाज, जय भगवान महासंघ, हमाल पंचायत संघटना, चर्मकार विकास संघ महाराष्ट्र राज्य, माळी महासंघ अहिल्यानगर, महाराष्ट्र प्रदेश बारा बलुतेदार महासंघ अहिल्यानगर जिल्हा, जय भगवान महासंघ, सारस ज्येष्ठ नागरिक संघ, सकल ओबीसी भटके विमुक्त यलगार मेळावा, नामदेव विठ्ठल मंदिर शिंपी समाज, जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगर, फुले ब्रिगेड, हर दिन मॉर्निंग ग्रुप भिंगार, आराध्य प्रतिष्ठाण, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद महाराष्ट्र राज्य व नेसी, सकल ओबीसी भटके विमुक्त एल्गार मेळावा, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती भिंगार (१७ मंडळे), श्री देवांग कोष्टी समाज भिंगार, माळी महासंघ महाराष्ट्र प्रदेश, श्री नामदेव विठ्ठल मंदिर डावरे गल्ली, क्रांतीसुर्य बहुउद्देशीय प्रतिष्ठान आदी संघटनांचा समावेश आहे. या सर्व संघटनांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविणारी पत्रे कृती समितीकडे सुपूर्द केली.

नदीपात्रात सुरु असलेल्या अवैध वाळू उपशावर छापा

जेसीबी, दोन हायवा व ट्रॅक्टरसह १९.६० लाखांचा मुद्देमाल जप्त; चौघांना केली अटक

नगर – पारनेर तालुक्यातील खडकवाडी गावच्या शिवारातील बोरवाक परिसरात मांड ओहोळ नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर पारनेर आणि घारगाव पोलिसांनी संयुक्तपणे छापा टाकला. १६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री करण्यात आलेल्या या कारवाईत वाळू उपशासाठी वापरण्यात येणारा एक जेसीबी, दोन हायवा डंपर आणि एक ट्रॅक्टर-ट्रॉली अशी एकूण १९ लाख ६० हजार रुपये किमतीची वाहने जप्त करण्यात आली. याप्रकरणी चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर पोलिस ठाण्याचे गुन्हे शोध पथक १६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री रात्रगस्त घालत असताना स.पो.नि.सोमनाथ दिवटे यांना घारगाव (ता.संगमनेर) पोलिस ठाण्याचे पो.नि.संदीप वऱ्हाडे यांचा फोन आला. खडकवाडी गावच्या शिवारातील बोरवाक येथे मांड ओहोळ नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती वरिष्ठांकडून मिळाली असून, त्याठिकाणी कारवाई करण्यासाठी पथक पाठविण्याची विनंती करण्यात आली. त्यानुसार स.पो.नि. दिवटे यांनी पारनेर पोलिसांच्या पथकाला कारवाईसाठी पाठविले. पोलिसांचे पथक रात्री दीडच्या सुमारास पथक घटनास्थळी पोहोचले. तेथे घारगाव पोलिसांचे पथकही उपस्थित होते.

रात्री १.४० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी पंचांसह मांड ओहोळ नदीपात्रात अचानक छापा टाकला. यावेळी एका जेसीबीच्या साहाय्याने अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असल्याचे आढळले. तसेच वाळू भरण्यासाठी दोन हायवा डंपर आणि एक ट्रॅक्टर-ट्रॉली घटनास्थळी उभी असल्याचे दिसून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत जेसीबीसह सर्व १९ लाख ६० हजारांची वाहने वाहने आणि त्यावरील चालकांना ताब्यात घेतले. या प्रकरणी रोशन भाऊसाहेब बर्डे (वय २३, रा. तास/वनकुटे), सूरज नरेश कर्नावट (वय १९, रा. ढोकी), अजित विलास केदारी (वय २६, रा. वनकुटे) आणि विक्रम देविदास शिंदे (वय २८, रा. वनकुटे) या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

पोलिस कर्मचारी कल्याण लगड यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) तसेच पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कलम ३ व १५ अन्वये संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

भाड्याने देणे

एम जी रोड,
प्राईम लोकेशनवर
३ मजली
दुकान भाड्याने
देणे आहे.
9588412500

भाड्याणे देणे आहे

बालिका आश्रमरोड महालक्ष्मी उद्यान समोर
असलेले १२ X १५ फुटाचे २ गाळे किंव्हा
दोन्ही मिळुन एकच गाळा, डॉ. क्लिनीक,
बँक, पतसंस्था, ऑफिस, गोडाऊन, कॅफे,
हॉटेल इ.साठी भाड्याणे देणे आहे
संपर्क
9975672401

ड्रायव्हर पाहिजे

जीतो गाडीवर
ड्रायव्हर
राजमुद्रा ट्रान्सपोर्ट
कल्याणरोड, अहिल्यानगर
9881478711

ड्रायव्हर पाहिजे

जितो, पिकअप, आयशर
करिता ड्रायव्हर पाहिजे
पगार २००००रु
संपर्क
9921918273

पाहिजेत

डिलीव्हरी बॉय
(३ जागा)
ऑफिस वर्कसाठी मुली
(२ जागा)
9657058444

पाहिजेत

होलसेल मेडिकलमध्ये
सेल्समन
हेल्पर
संपर्क- व्हॉटसअपवरच मो. क्र.
9822040516

पाहिजेत

वेटर -६ हेल्पर - ४
साउथ इंडियन
वस्ताद -१
किचन हेल्पर -२
मोरीवाला - ४
9822212124

- पाहिजेत -

बिलिंग एक्झिक्युटिव्ह - २
१२वी पास/पदवीधर,
फक्त विवाहित महिला, संगणकाचे ज्ञान
कामाची वेळ : सकाळी ९.३० ते सायं. ७.००
- आकर्षक पगार | समक्ष भेटा -
के. प्रकाश अँण्ड कंपनी (गांधी)
मुंजोबा स्वीटस् शेजारी, मार्केटयार्ड रोड,
अहिल्यानगर. मो. 9665511179

2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.

Harish Enclave,
कवडे नगर, वालिकाश्रम रोड,
सावेडी, अहिल्यानगर
फॅमिलीसाठी भाड्याने देणे
फॅमिलीसाठी सुरक्षित व शांत परिसर.
पार्किंगची सुविधा (गरजेनुसार)
M- 08421515251
Agent No Please
भाडे ₹13,500/-
डिपॉझिट ₹27,000/-

पाहिजेत

होलसेल दुकानात
कामासाठी अनुभवी लेडीज
आणि जेन्टस् पाहिजेत
जेन्टस् - १
लेडीज -१
7218366736

पाहिजेत

बँकिंग टेलिकॉलिंगसाठी
मुले/मुली : १०
टीम लिडर : २
(अनुभवींना प्राधान्य-आकर्षक पगार+ इन्सेंटिव्ह)
ईझी लोनस C/O एअरटेल
8600606060

पाहिजेत

Msc Biology/
Microbiology
(जागा -०१)
Bsc Nursing
(जागा -०२)
पंडित हॉस्पिटल
कोठी रोड, अहिल्यानगर
8847731240
8446676464

डँटल केअर दवाखान्यासाठी मुले पाहिजेत

डँटल असिस्टंट,
रिसेप्शनसाठी
मुले/मुली पाहिजेत
गरजू व्यक्तींनी संपर्क साधावा.
Smiling Wonders
खंडेलवाल हिरलीन, पंजाब नॅशनल बँके समोर,
लालटाकी रोड, अहिल्यानगर.
8668507148

MIDC मध्ये कंपनीत जागा भरणे आहे

१. वेल्डर - ५ जागा
२. ड्रायव्हर - ५ जागा
३. हेल्पर - ८ जागा
7798010203
7798396262

पाहिजेत

सेल्समन: १० जागा
सेल्सगर्ल : १० जागा
आकर्षक पगार व कमिशन मिळेल.
गणपती फॅमिली शॉपी, अहिल्यानगर
9851440444

पाहिजेत

नामांकित कंपनी
हॅप्पी मेडिकेअर
सावेडी, अहिल्यानगर येथे नामांकित
कंपनीत ऑफिस कामासाठी
मुली व मुले पाहिजेत.
शिक्षण -१२ वी पास व पदवीधर,
वयोमर्यादा १९ ते ३० पर्यंत
संपर्क
9172194775
8459809981

पाहिजेत

मार्केट यार्डमधील प्रतिष्ठित प्लास्टिक
दुकानामध्ये खालील जागा भरणे आहे.
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
सदर क्षेत्रातील अनुभव
अर्जासह समक्ष भेटा
मे. प्रगत प्लास्टिक बारदाना
मार्केटयार्ड, मर्चंट बँकेजवळ,
अहमदनगर. मो. 9423791130

पाहिजेत

N.P. INFRA, अहिल्यानगर कार्यालयासाठी
अनुभवी अकाउंटंटची आवश्यकता
(महिला किंवा पुरुष)
आवश्यक पात्रता व अनुभव
Tally चे 100% ज्ञान व प्रत्यक्ष कामाचा अनुभव अनिवार्य.
अकाउंटिंग क्षेत्रातील किमान 3 ते 5 वर्षांचा अनुभव.
GST, Billing व Accounts संबंधित कामाचा अनुभव.
दैनंदिन अकाउंट्स व आर्थिक व्यवहार हाताळण्याची क्षमता.
प्रामाणिक, जबाबदार व कामात कुशल असणे आवश्यक.
अनुभवी व पात्र उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर अर्जासह समक्ष भेटा
NP Infra | पोंक्षरणा
सत्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर

फ्रेश स्टॉक

महावीर मॉल...
स्वस्त परंतु चांगले कपडे
खरेदी करणाऱ्या ग्राहकांनीच
कृपया मॉलला भेट द्यावी.
जेन्टस-लेडीज स्वेटर, जर्किन, हुडी, अप्पर, मफलर,
हँड ग्लोज, उलन कॅप सर्व साईझमध्ये आणि होलसेल दरात..
सरसकट २०% डिस्काऊंट..



मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ,
मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001



थंडीचे कपडे...

जन्मलेल्या बाळापासून
मोठ्या महिला व पुरुषांसाठी,
मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स, जॅकेट, जर्कीन,
टोपी, उलन स्टोल, मफलर,
सॉक्स, स्वग व
अजून बरेच काही
आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

Career Ki Shuruvat DISHA ke saath

An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER


Get Any Course Just in 2700/-

MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.

दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769

जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी, अ.नगर.
9371151769

पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, बिलबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769



डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

- चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
- पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
- डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
- डोकेदुखी, मायग्रेन - फिटचे आजार, अपस्मार
- हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
- तोल जाणे - व्हर्टिगो, चक्कर येणे - अर्धांगवायू, पॅरेलीसीस - विसराळूपणा - थरथर सुटणे, पार्किन्सन

या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
- सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
- सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे



फेब इंडियन

हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट
आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन
आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे
- चंदेरी आणि पटोरा साडी
- बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
- पॅच वर्क • पश्चिम बंगाल साडी
- लखनवी चिकन • कोटा सिल्क
- काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
- जयपुर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
- भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट
BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत
Diwali Special
पार्किंग व एन्ट्री फी
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

१२ वे पुण्यस्मरण



आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..
श्रीमती राजेश्वरी विठ्ठलराव संभार
स्व.दि. १७/११/२०१४
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
* दुःखांकित *
सदाशिव विठ्ठलराव संभार
सौ.शारदा चंद्रकांत रायपेल्ली
कृष्णा विठ्ठलराव संभार
सौ.शैला सुरेश मुदगुंडी
महेश विठ्ठलराव संभार
श्रीमती शामा रविंद्र चिलका
श्री.वेदांत, चि.शुभम, चि.श्रेणीक
सौ.वंदना विजयराव गुल्लापेल्ली
कु.वैभवी वेदांत संभार
समस्त संभार परिवार, अहिल्यानगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
१९ नोव्हेंबर २०२६



रामायण २ डी (हिंदी)
08:00 AM 03:30 PM
08:45 AM 05:30 PM
10:00 AM 07:15 PM
11:45 AM 08:00 PM
12:30 PM 09:15 PM
01:45 PM 11:00 PM
11:35 PM
रामायण ३ डी (हिंदी)
10:45 AM 06:15 PM
02:30 PM 10:00 PM
आधी अनंत (मराठी)
04:45 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : १६ ते १९ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



SCREEN - 2
09.00 AM 150/- 2D
01.00 PM 200/- 2D
05.00 PM 200/- 2D
09.00 PM 200/- 2D
SCREEN - 1
09.30 AM 200/- 3D
01.30 PM 250/- 3D
05.30 PM 250/- 3D
09.30 PM 250/- 3D
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर